
MAHMAR/19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष चौदावे / अंक ३ / मार्च २०१३

## संपादकीय

### जागतिक वन दिन, जल दिन, हवामान दिन

डॉ. माधव गाडगीळ समितीचा पश्चिम घाट व दीड लाख चौरस किलोमीटरहून अधिक क्षेत्राचे जतन या संदर्भातील अहवाल स्वीकारायला संबंधित राज्ये तयार नाहीत; परंतु या मोहिमेने पर्यावरण विषयक जागृतीची जी राळ उठवली त्यामुळे पश्चिम घाट बचाव व सातपुडा बचाव यामुळेच या टापूतील समृद्ध वन्य जीवनास जागतिक वारशाच्या यादीत स्थान मिळाले. डॉ. माधव गाडगीळ हे ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ असून पश्चिम घाट, राजस्थान, हिमालय, पूर्व आफ्रिका, अमेरिका येथील अभ्यासाचा त्यांचा व्यासंग मोठा आहे. सस्तन प्राण्यांची वागणूक पद्धती, आदिवासी जमातीला अनुकूल असणाऱ्या जीवन पद्धती, देवराया या व अशा अनेक विषयांचा अभ्यास करताना पर्यावरणाची खरी जाणीव जंगलात राहणाऱ्यांना आहे. हे त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी बिंबवले आहे.

पश्चिम घाट बचाव मोहिमेला २५ वर्षे झाली. त्या निमित्ताने अलिकडेच महाबळेश्वरला तीन दिवसांचे विचारमंथनही झाले होते. हे सर्व तपशील देण्याचे कारण, मार्च महिन्यात २१ मार्चला जागतिक वन दिन, २२ मार्चला जागतिक जल दिन व २३ मार्चला जागतिक हवामान दिन आहे.

पर्यावरण म्हणजे निसर्गातील सजीव व निर्जीव घटकांचे एकमेकांचे जे संबंध आहेत, त्यांचा अभ्यास अशी व्याख्या केली जाते. या व्याख्येस ब्रिटीश शास्त्रज्ञ स्टॅनले (१९३५) पासून अनेकांनी अनेक व्यक्तींनी परिपूर्णता आणली आहे. रोज नव्याने निर्माण होणारे जाणीवपूर्वक निर्माण केले जाणारे प्रश्न, नवनवीन कारणे व त्यांना घातले जाणारे खतपाणी, लोकप्रतिनिधी आणि स्थानिक प्रशासन यांच्यावर दबाव आणू शकणारे अभ्यासगट कमी पडणे. या सर्वांमुळे कागदावरच्या योजना कागदावरच राहताहेत. पर्यावरणाचा ऱ्हास, हरितगृहाचा परिणाम, ओझोनचा प्रश्न अशा अनेक मूलभूत प्रश्नांवर अभ्यासाच्या पातळीवर चर्चा होतात. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरांवर चर्चा होतात. या सर्वांतून या रोजच वाढत जाणाऱ्या प्रश्नांचे गांभीर्य अधोरेखित होत चालले आहे. तरीही हा विषय प्रामुख्याने शहरी व पुस्तकीच ठरत आहे. अभ्यासक्रमात हा विषय आणणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असले तरी सर्व सामान्यांच्या दृष्टीने हा प्रश्न व याचे गांभीर्य अजून म्हणावे त्या प्रमाणात पोहोचले नाही.

(पृष्ठ क्र. ... २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय)**

याचे मूलभूत कारण पर्यावरण की विकास असा प्रश्न येतो तेव्हा स्वतःच्या तुमड्या भरता येतील अशा मानवी संबंधातील व्यवहारांना झुकते माप देणारे लोकप्रतिनिधी, मंत्री, संत्री आणि हुकूमशाही वृत्तीचे स्थानिक नेते. शहरे सुजवायची, नैसर्गिक पर्यावरणाची लावता येईल तेवढी वाट लावायची. संसाधनांच्या त्यास्य वाटपातही स्वतःचे पारडे कसे जड होईल हे पाहायचे या वृत्तीमुळे आजची दुर्दशा ओढवली आहे. मूठभर विरोधक, स्वयंसेवी संस्थांचा सह्याद्री बचाव, सातपुडा बचाव, नद्या जोड प्रकार इत्यादींची भलावण करणाऱ्यांचा विरोध मोडून काढायचा, सर्व विधायक प्रयत्नांत राजकारण आणून सिद्धांतांना मूठमाती द्यायची हे जेथपर्यंत चालू आहे तेथवर आशा कसली ठेवायची?

सदाहरित वने, निम सदाहरित वने, पानझाडी वृक्षांची वने, काटेरी व खुरट्या वनस्पतींची वने, खारफुटीची वने, नद्याकाठची वने हे जंगल शास्त्रानुसार वनांचे सहा प्रकार आहेत. प्रत्येक प्रदेशात किती जमीन जंगलाखाली असायला हवी, किती आहे, याची ६० वर्षातील आकडेवारी संगणकाच्या आधारे अभ्यासली, तर सर्वत्र फक्त लूट चाललेली दिसेल. जंगलातून होणारी तोड आणि तस्करी हा विषय गहन आहे. जागतिक जल दिनाच्या निमित्ताने स्वातंत्र्योत्तर कालखंडात वाढलेली कारखानदारी व या कारखानदारीमुळे वाढणारे प्रदूषण यांमुळे बारमाही नद्यांची गटारे बनत चालल्याचे चित्र आहे. भारतीय संस्कृतीत असणारे नद्यांचे सर्वप्रकारचे महत्त्व या अमानवी वागण्यामुळे पुसून टाकणे चालले आहे. या आव्हानामुळे दुष्काळ व महापूर हा बारमाही विषय झाला आहे. वाळूमाफिया आणि डोंगर सोलून काढणारे जो विकास करू पाहताहेत तो विकास आहे की आणखी काही? या विषयातले तज्ज्ञ भाकित करत आहेत की जगात तिसऱ्या महायुद्धाची ठिणगी पडेल ती पाण्यामुळेच. साधा रेन वाटॅर हार्वेस्टींग (पावसाचे पाणी साठवा) यासारखा विषयही या निबर कातडीच्या प्रशासकीय यंत्रणेला समजू नये? पाण्यामुळे युद्ध हे भविष्य फार दूर नाही. ओंजळभर पाणी पाजणे हे काल परवापर्यंत पुण्य असलेल्या देशात 'बिसलेरी' संस्कृती झपाट्याने पसरली; कारण त्यात पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत बिघडवणारे जसे आहेत, तसेच त्यातून खोऱ्याने पैसा ओढणारेही आहेत. नागरीकरणाचा वेग न भूतो न भविष्यती असा वाढत चालला आहे. पाणी, जंगल, वीज यांचे स्त्रोत कमी पडत आहेत. लोकसंख्या वाढ हा विषय मारुतीच्या शेपटासारखा वाढतो आहे.

तरीही अनेक तज्ज्ञांच्या मते आजच्या घडीला तरी निसर्ग सगळ्यांच्या गरजा भागवू शकतोय; पण माणसांची वाढती हाव वाढवणारे तिचा वारसा आपल्या पुढच्या पिढ्यांना देणारे राज्यकर्ते व लोकप्रतिनिधी एकूणच ज्या पद्धतीने निवडून येतात, निवडून आणले जातात. त्यांची लोकशाहीबद्दलची जाण म्हणजे आनंदच आहे. या पार्श्वभूमीवर 'जसे लोक तसे त्यांचे नेते' असे म्हटल्यास गैर नाही. 'लोक असे का?' तर मूल्यहीन समाजात संस्कृतीचा होणारा ऱ्हास गेली साठ वर्षे चालू आहे, हे या देशाच दुर्दैव! स्टॉक होम परिषद (१९७२), नैरोबी परिषद (१९७७) इ. महत्त्वाच्या परिषदांत रिओडी जानेरो (ब्राझील, १९८२) ही परिषद महत्त्वाची मानली जाते. इतर अनेक महत्त्वाच्या विषयांबरोबर 'आदिम जमातींच्या हिताचे रक्षण' या विषयावर तपशीलवार विचार यात झाला. भारतीय जंगलांतही अनेक आदिवासी आहेत. मतांच्या राजकारणासाठी त्यांना 'नागरी' करण्यापेक्षा ते आहेत त्या पर्यावरण विषयक पार्श्वभूमीवर त्यांना शिक्षणासारख्या सुविधा द्यायला

(पृष्ठ क्र. ... ३ वर)

वर्ष चौदावे/अंक ३/मार्च २०१३

वर्ष चौदावे/अंक ३/मार्च २०१३

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १७ वे/अंक ९ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. मोहन पाठक | |
| २) | शानडाँग संग्रहालय | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | श्रीमत् भगवद् गीता - अध्याय दुसरा<br>विषय : सांख्ययोग | श्री. शं. बा. मठ | ६ |
| ४) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १५ |
| ५) | एक कमालीचा छंदिष्ट माणूस<br>श्रीकृष्ण गोविंद, उर्फ नाना पारनाईक सर | श्री. सुभाष जोशी | १८ |
| ६) | महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र<br>महाराष्ट्र साहित्य पत्रिका | श्री. शरद जोशी | २१ |
| ७) | ग्रामीण भाषेतील लक्षवेधी शब्दकला | ग्रंथप्रेमी | २६ |
| ८) | 'फ्युटेक -१३' एका नव्या पर्वाची सुरुवात ! | दिनकर बोर्डे | २७ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २९ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर
  कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२
  या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# शानडाँग संग्रहालय

*चीनमधील शानडाँग संग्रहालयाची ही उद्‌बोधक माहिती*

चीनमध्ये प्रत्येक प्रांताच्या राजधानीच्या ठिकाणी त्या प्रांताचे वैशिष्ट्य विशद करणारे संग्रहालय उभारलेले आहे. जीनान ही शानडाँग प्रांताची राजधानी असून या शहरात चिनी प्रजासत्ताकाची स्थापना झाल्यावर लगेच या संग्रहालयाची स्थापना करण्यात आली. संग्रहालयाच्या जवळ पोहोचताच त्याची पांढऱ्या रंगाची दगडी इमारत आपल्या नजरेत भरते. जीना चढून संग्रहालयाच्या प्रवेशद्वाराकडे जाण्याआधी मोठ्या दगडात कोरलेल्या कासवाचे आपल्याला दर्शन होते. सहस्त्रबुद्ध डोंगराच्या पार्श्वभूमीवर बांधलेले हे वस्तुसंग्रहालय सुंदरच नाही तर भव्यदेखील आहे. यात २१,००० मीटर एवढा परिसर प्रदर्शनासाठी ठेवलेला आहे. या संग्रहालयात एकूण १०,५०० एवढ्या वस्तू आहेत. त्याचबरोबर १२,०००० एवढी पुस्तके आहेत. अशा भव्य संग्रहालयाचा जरा फेरफटका मारू या.



**संग्रहालयाची भव्य दगडी इमारत**



**प्रवेशद्वाराजवळ असलेला दगडी कासव**

संग्रहालयात प्रवेश करून आपण डावीकडे वळतो तोच आपल्याला उत्खननात सापडलेल्या वस्तूंचे प्रदर्शन पाहायला मिळते. यांत प्रामुख्याने मातीची भांडी आणि धातूच्या वस्तू आढळतात. वस्तू कोणत्या ठिकाणी उत्खननात सापडली तिचा कालावधी काय असावा याची माहिती सविस्तरपणे दिलेली आहे. लाकडी कपाटात या वस्तू ठेवलेल्या असून काचेच्या तावदानातून त्या स्पष्टपणे पाहता याव्यात यासाठी चांगली प्रकाशयोजना केलेली आहे.



**उत्खननात सापडलेली मातीची भांडी**

उत्खननाचा हा विभाग संपवून आपण पुढे जातो. तो दैनंदिन वापराच्या धातूच्या वस्तू आपल्याला दिसतात.

दिवा लावला की अंधार उरत नाही.

यांमध्ये प्रामुख्याने ब्राँझच्या वस्तू आहेत. त्याचेही कीतीतरी आकार आपल्याला पाहायला मिळतात. अगदी मेणबत्तीच्या स्टँडपासून ते बैलगाडीच्या प्रतिकृतीपर्यंतच्या वस्तू आपल्याला आढळतात. त्यांचे वैशिष्ट्य असे की त्या सगळ्या वस्तू स्वच्छ करून पद्धतशीरपणे लावून ठेवलेल्या आहेत. कोणत्याही वस्तूचे छायाचित्र काढण्याची मुभा आहे. त्यामुळे आम्ही भरपूर छायाचित्रे काढली. त्यांतील काही खाली दिलेली आहेत.



**उत्खननात सापडलेल्या धातूच्या वस्तू**



**बैलगाडीची हूबेहूब प्रतिकृती**

चीनीमातीपासून बनविलेल्या शोभिवंत भांड्यांचा एक वेगळाच विभाग आहे. यांत अगदी लहान कपापासून ते खूप मोठ्या आकाराच्या भांड्यांपर्यंत विविध आकाराच्या आणि रंगाच्या वस्तूंचा समावेश आहे. प्रत्येकावर केलेले नक्षीकाम इतके सुबक आणि सुंदर आहे की पर्यटकांचे लक्ष वेधून घेतल्यावाचून राहात नाही. अशा वस्तू चीनमध्ये अजूनही बनविल्या जात आहेत. बाजारात त्या विकण्यास देखील ठेवलेल्या आढळतात. या संग्रहालयात असलेल्या वस्तू मात्र प्राचीन काळातल्या आहेत. याचाच अर्थ, ही कला चीनमध्ये फार पूर्वीपासून लोकांना अवगत होती असे दिसते.



**चीनीमातीच्या वस्तू**

दगडांमध्ये मूर्त्या कोरण्याची कला फार प्राचीन काळात उदयास आली. जेथे मूर्त्या कोरायला योग्य असे दगड आढळले तेथे तेथे लोकांनी मूर्त्या कोरून ठेवलेल्या आहेत. त्यांतील काही मूर्त्यांचे प्रदर्शन या संग्रहालयात केलेले आढळते. त्यातील एक मोठा विभाग राखून ठेवलेला आहे. यावरून ही कला येथे प्रचलित असून आजूबाजूला मूर्त्या कोरण्यास लागणारा दगड मुबलक उपलब्ध आहे याची आपल्याला माहिती मिळते.



**बुद्धाची दगडात कोरलेली मूर्ती**

मूर्त्या बनविण्याबरोबरच दगडांचा उपयोग छपाईचे साचे बनविण्यासाठी केला जात असे. असे अनेक साचे येथे ठेवलेले आहे. आपल्याला जे चित्र हवे असेल त्याचा विचार करून दगड कोरले जायचे. खाच आणि उंचवटा याच्या मदतीने हे साचे बनविले जायचे. या साच्यावर शाई

प्रमादावर मात करायची असेल तर सतत कार्यरत राहावे.

ओतून कागदावर किंवा कोणत्याही पृष्ठभागावर ठेवले की विशिष्ट आकाराचे चित्र तयार होत असे. अशाप्रकारचे अनेक साचे संग्रहालयात ठेवलेले आहेत. त्यांपैकी एक साचा आणि त्यापासून मिळणारी आकृती खालील चित्रात दाखविली आहेत.




**साचा व त्यापासून मिळणारे चित्र**

मोठ्या कागदावर चित्र काढण्याची कला चीनमध्ये खूप जुन्या काळापासून प्रचलित आहे. त्याचे अनेक नमुने आपल्याला संग्रहालयात पाहायला मिळतात. तेथे उपस्थित असलेले रंगकर्मी नवीन चित्रांची निर्मिती करीत असतात. ही चित्रे विक्रीला उपलब्ध असतात.



**कागदावर काढलेले चित्र**

शानडाँग प्रांताला मोठा समुद्र किनारा लाभलेला आहे. त्यामुळे या प्रांतातील लोक दर्यावर्दी असणे साहाजिक आहे. समुद्रात जायला सोयीचे व्हावे यासाठी त्यांनी अनेक प्रकारच्या बोटी बनविल्या. त्यांतील काही बोटी प्रदर्शनात ठेवलेल्या आहेत. एकेक बोट शेकडो वर्गफूट जागा व्यापते. त्यामुळे अशा फार बोटी येथे ठेवता आलेल्या नाही. तरीदेखील तेथे असलेल्या बोटीवरून चीनी लोकांच्या बोटी बांधण्याच्या कलेची कल्पना येते.



**एका भव्य बोटीच्या दुरुस्तीचे काम सुरू असताना**

शानडाँग संग्रहालयाचा पसारा फारच मोठा आहे. पूर्ण संग्रहालय पाहायचे तर एक दिवस पुरणार नाही. आम्हांला जेमतेम चार तास मिळाले. तेवढ्या अवधीत शक्य तेवढ्या वस्तू पाहण्याचा आम्ही प्रयत्न केला. तेवढ्यावरून संग्रहालयाच्या भव्यतेची कल्पना आली. त्याचबरोबर प्राचीन काळातील वस्तूंचे जतन करण्याची चीनी लोकांची वृत्ती देखील जाणवली. समाधानाने आम्ही संग्रहालयाच्या बाहेर पडलो.



**संग्रहालयाच्या बाहेर सजवलेली फुलांची बाग**

**– डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा वैभव नगरी,
काटई, शीळ रोड, ता. कल्याण
जि. ठाणे – ४२१२०४

●●●

# श्रीमत् भगवद् गीता - अध्याय दुसरा
# विषय : सांख्ययोग

*गीतेच्या दुसऱ्या अध्यायाचे हे सार्थ चिंतन - संपादक*

### श्लोक १ ते १० अर्जुनाची मानसिक स्थिती व श्रीकृष्णाशी संवाद

श्रीकृष्ण व अर्जुनाचा संवाद संजय राजा धृतराष्ट्राला कथन करीत आहे.

संजय म्हणाला, राजन् करुणेने व्याप्त झालेल्या डोळे अश्रूंनी भरुन आलेल्या, खिन्न हृदय झालेल्या त्या अर्जुनाला श्रीकृष्ण म्हणतात, हे अर्जुना आर्य असे आचरण कधीही करत नाहीत, अरे स्वर्ग प्राप्तीत अडथळा उत्पन्न होतो व दुष्कीर्तीत भर पडते असे मनाचे हे औदासीन्य या संकट समयी कोठून बरं प्राप्त झाले? हे पृथानंदना तू असा तृतीय पुरुषी बनू नकोस. हे योग्य नाही. अरे तू शत्रूचा थरकाप उडवणारा आहेस. ही दुर्बलता टाक व उठून उभा रहा. अर्जुन कृष्णाला म्हणतो - हे मधुसूदना मी भीष्म व द्रोण यांच्यावर बाणांचा वर्षाव कसा करू? हे शत्रू सूदना हे पूजनीय आहेत. ह्या गुरुजनांची अंतःकरणे अति उदार आहेत. यांना युद्धात न मारता भिक्षा मागून जगात राहणे हे अधिक कल्याणकारक आहे. असे नच केल्यास त्यांना मारून त्यांच्या रक्ताने माखलेले प्राप्त झालेले भोगच भोगावे लागतील. आता या दोहोंपैकी आम्हाला कोणते चांगले व श्रेयस्कर? काय आम्ही विजयी व्हावे? अगर त्यांनी आम्हाला जिंकावे? हे कळेनासे झाले आहे. त्यांना मारून आम्ही जिवंत राहावे असे आम्ही इच्छित नाही. परंतु तेच धृतराष्ट्र संबंधि लोक आमच्या समोर उभे आहेत. मोहवशतेने माझी वीरवृत्ती लुप्तशी झाली आहे म्हणून कर्तव्याचा निश्चय मोहाविष्ट वृत्तीने मी करू शकत नाही. मी तुला विनंती पूर्वक विचारतो की जे निश्चितरूपाने कल्याणकारक आहे ते मला सांग. मी तुझा शिष्य तुला शरण आलो आहे. या पृथ्वीवर निष्कंटक आणि संपन्न राज्य अथवा इंद्रपद जरी प्राप्त झाले तरी माझ्या इंद्रियांना कोरडे पाडणारा हा शोकताप दूर करण्याचा कोणताही उपाय मला आता तरी दिसत नाही. इतके बोलून हे राजन् अर्जुन 'मी लढणार नाही असे गोविंदाला सांगून' स्तब्ध झाला. त्यावेळी धृतराष्ट्र दोन्ही सैन्यामधे खिन्न होऊन बसलेल्या अर्जुनाला श्रीकृष्ण किंचित हास्य करुन त्याशी बोलता झाला.

### श्लोक ११ ते ३० श्रीकृष्ण सांख्य योगाबद्दल अर्जुनाला माहिती देतो.

भगवान श्रीकृष्ण म्हणतात - अरे ज्यांचा शोक करणे योग्य नाही त्यांचाच शोक तू करत आहेस आणि ज्ञानाबद्दलच्या बाता करत आहेत. परंतु ज्ञानी लोक मेलेले वा जिवंत आहेत अशाच्याबद्दल शोक करत नाहीत. हे बघ पूर्वी मी कधी नव्हतो वा तू नव्हतास असे नाही. हे राजे लोक कधीच नव्हते असे नाही. या पुढील काळात आम्ही सारे असणारच नाही असेही नाही. म्हणजे आम्ही पूर्वी होतो आता आहोत व पुढेही असू. देहधारी आत्म्याला देहामुळे बालपण, तरुणपण आणि वृद्धपण प्राप्त होते. त्याचप्रमाणे पुढे त्या आत्म्याला दुसरा देहही प्राप्त होतो. याविषयी ज्ञानी लोकांना खात्री वाटते. हे अर्जुना इंद्रियांचे बाह्य जगाशी होणारे स्पर्श शीत, उष्ण, सुख, दुःख यांनी युक्त असतात. ते कधी असतात कधी नसतात. म्हणजे ते अनित्य आहेत. यासाठी भरत कुलोत्पन्ना ते तू फक्त अनुभव व शांत रहा. कारण हे पुरुष श्रेष्ठा अशा प्रकारे सुख दुःख समान मानणाऱ्या पुरुषाला यामुळे त्रास होत नाही, म्हणजेच तो अमृतत्वाला योग्य होतो. आणि दुसरे असे की, जे

मुळातच नाही ते अस्तित्वात असू शकत नाही आणि जे मूळ स्वरूपात आहे ते कधीही नाहीसे होत नाही. तत्त्वज्ञानी लोकांनी याप्रकारे या दोहोंचाही टोकाला जाऊन निश्चय केला आहे. असे तू समज की ज्याने हे सर्व जग व्यापून टाकले आहे तेच अविनाशी आहे. या अविनाशी तत्त्वाचा विनाश करण्यास कोणीही समर्थ नाही. हे अविनाशी तत्त्व कसे आहे म्हणशील तर सांगतो, ऐक. ते लक्षात येण्याच्या पलीकडचे आहे (अचिंत्य) ते नित्य आहे असे असून जे शरीर धारण केले जाते. ते मात्र नाशवंत आहे. नाशवंत देहाचा नाश कर. मात्र या आत्म्याला मी मारतो असे समजतो किंवा जो हा मारला जातो असे समजतो त्या दोघांनाही काही समजत नाही. आत्मा मारीतही नाही आणि मारलाही जात नाही, आणि हा आत्मा कधी जन्मतही नाही किंवा कधी मरतही नाही. हा जन्मतो व नाश पावतो असेही नाही. हा अजन्मा, नित्य, शाश्वत आणि पुरातन आहे. शरीराचा नाश झाला असतानाही याचा नाश होत नाही. हे अर्जुना जो या आत्म्याला नित्य, अविनाशी अजन्मा, आणि न बदलणारा आहे असे जाणतो तो पुरुष कसा बरे कोणाला मारतो वा मारवितो? हे बघ. ज्याप्रमाणे मनुष्य फाटक्या वस्त्रांचा त्याग करून दुसरी नवी वस्त्रे धारण करतो त्याप्रमाणे देहधारी आत्मा जीर्ण शरीरांचा त्याग करुन नूतन शरीरे धारण करतो. या आत्म्याला शस्त्रे तुकडे करू शकत नाहीत, याला अग्नी भस्म करू शकत नाही, याला पाणी विरघळून टाकू शकत नाही, वायू याला रसहीन करू शकत नाही. थोडक्यात हा आत्मा कापला जात नाही, जाळला जात नाही, भिजवला जात नाही व सुकविलाही जात नाही. तर हा नित्य सर्वस्थानी असणारा, स्थिर, अचल आणि सनातन आहे. त्यामुळे हा अव्यक्त, अचिन्त्य, विकार रहित असा मानला जातो. हे आत्म्याचे स्वरूप ओळख व शोक करू नकोस. आणि जर तू असे मानीत राहशील की हा आत्मा सदाचा जन्मतो आणि मरतो तरी देखील हे अर्जुना याचा शोक करणे तुला योग्य नाही. कारण जन्मतो तो मरतो व मरतो तो पुनः जन्मतो. असे असताना या सृष्टीतील आवर्तित होणाऱ्या गोष्टीचा शोक करणे तुला उचित नाही. हे भारता उत्पत्तीच्यापूर्वी सर्व भूते अव्यक्त असतात. मधल्यावेळी ती व्यक्त होतात व मृत्यूनंतर ती पुनः अव्यक्त होतात. अशा अवस्थेत व्यक्त अव्यक्तासाठी शोक करणे योग्य नाही. त्यामुळे कोणी या आत्म्याकडे आश्चर्याने पाहतात, कोणी याचे आश्चर्य पूर्ण वर्णन करतात, कोणी हे आश्चर्याने ऐकतात. परंतु ऐकूनही कोणी यास जाणत नाहीत. हे भारता सर्वांच्या शरीरात राहणारा, शरीरांचा स्वामी जो आत्मा त्याचा वध केव्हाही होऊ शकत नाही. म्हणून सर्व भूतांविषयी (निर्मिती) शोक करणे योग्य नाही.

### श्लोक ३१ ते ३८ क्षात्रधर्मानुसारही युद्ध आवश्यक

अर्जुना स्वधर्मानुसार आचरण करणाऱ्याने भयभीत होण्याचे काहीच कारण नाही. कारण क्षत्रियाला धर्मयुद्धाहून मोठे कल्याणकारक कर्तव्य असू शकत नाही. हे पृथानंदना अनायासे प्राप्त झालेले खुले स्वर्गाचे द्वार हे भाग्यवान क्षत्रियांनाच लाभते. जर हे धर्मयुद्ध तू करणार नाहीस तर स्वधर्म आणि कीर्ती यांना मुकशील व पापाचा धनी होशील. इतकेच नव्हे पण सर्व तुझ्या कायमच्या दुष्कीर्तीचा डंका वाजवतील. संभावित माणसांना दुष्कीर्ती ही मरणाहूनही अधिक तापदायक होते. तू भयभीत होऊन युद्धभूमीवरून पळालास असे येथील महारथी समजतील. तुझा सन्मान करणारेदेखील तुझ्याकडे तुच्छतेने पाहातील. तुझ्या सामर्थ्याची निंदा करतील व बोलू नये ते बोलतील. याहून तुला दुःखकारक दुसरे काय असू शकेल? युद्धात मेलास तर स्वर्गात जाशील जर जिंकलास तर पृथ्वीचे राज्य मिळवशील. म्हणून हे अर्जुना युद्धाचा निश्चय कर व उठ. सुख दुःख लाभ हानि आणि जय-पराजय यांना सारखे समजून युद्धास प्रवृत्त हो. असे करण्याने तुला पाप लागणार नाही.

### श्लोक ३९ ते ५३ निष्काम कर्मयोगाबद्दल माहिती

हे अर्जुना हा तुला सांख्य मतानुसार विचार सांगितला आता योग मतानुसार विचार सांगतो तो ऐक. या

विचारानुसार तू कर्म बंध दूर करू शकशील. सर्व प्रथम येथे आरंभ केलेल्या कर्माचा नाश होत नाही. यात विघ्नही येत नाही. त्या मतानुसार थोडेही आचरण केलेस तरी मोठ्या भयापासून संरक्षण होते. हे अर्जुना या मार्गामध्ये व्यवहारासाठी स्थिर राहणारी एकच बुद्धी उपयोगी पडते. असा व्यवहार न करणाऱ्यांची बुद्धी अनेक म्हणजे चंचल असते. त्यामुळे अनेक फाटे फुटतात. हे अर्जुना, वेद मताने वागणारे मोठ्या दिमाखात सांगत राहतात. या मतासारखे दुसरे काहीही नाही. हे लोक अज्ञानी असून केवळ स्वर्गाची इच्छा करतात. स्वर्गालाच परमश्रेष्ठ मानून भोग आणि ऐश्वर्य यांच्या लाभाचे विशेष वर्णन करतात. मात्र त्यांना केवळ जन्म मरण रूप फलच प्राप्त होत असते. परंतु त्यांची भाषा भुरळ पाडणारी असते. त्या बोलण्यांमुळे आकर्षित होणारी मंडळी भोग, ऐश्वर्य यांच्या लाभाचे विशेष वर्णन करतात. मात्र त्यांना केवळ जन्म मरण रूप फलच प्राप्त होत असते. परंतु त्यांची भाषा भुरळ पाडणारी असते. त्या बोलण्यांमुळे आकर्षित होणारी मंडळी भोग, ऐश्वर्य या गोष्टीतच बुद्धी गुंतून ठेवतात, ती समाधीसारखे चिर सुख अनुभवू शकत नाहीत. हे अर्जुना शिवाय वेददेखील त्रिगुणात्मक विषयांनी युक्त आहेत. तू या तीनही गुणा पलीकडे जाण्याचा प्रयत्न कर आणि नित्य सत्व गुणातच स्थिर रहा. द्वंद्वापासून मुक्त हो. काही मिळविणे व तिचे रक्षण करणे आहे असा विचार करू नकोस. श्रेष्ठ अशा आत्मबलाने तू युक्त हो आणि असे बघ लहानशा जलाशयात जे आपण आपली गरज भागवितो तशीच ते मोठ्या जलाशयानेही भागते त्याच प्रमाणे वेदाने जे प्राप्त होवू शकते ते ब्रह्म जाणण्यामुळेही प्राप्त होते. दुसरी गोष्ट म्हणजे कर्म करणेच आपला अधिकार आहे. त्यापासून मिळणाऱ्या फळाचा हेतू मनात बाळगणे हा आपला अधिकार नाही. फळाचा हेतू मनात धरून कर्म प्रवृत्त होऊ नकोस. मात्र कर्म न करता स्वस्थ बसण्याचेही करू नकोस. हे अर्जुना, फळ प्राप्ती होवो वा ना होवो त्याबद्दल मनात कोणताही विकल्प न बाळगता शांत बुद्धीने कर्म करणाऱ्या बुद्धीलाच समत्व योग म्हणतात. अर्जुना काही अपेक्षा ठेवून केलेले कर्म हे या बुद्धीयोगाहून कमी प्रतीचे आहे. म्हणून बुद्धियोगाचा तू आश्रय कर. फळाचा हेतू मनात ठेवून कर्म करणारे हे कमी प्रतीचे होत. या समत्व बुद्धीने कर्म करणारे लोक चांगले वा वाईट या दोहोना दूर सारतात यासाठी तू समत्व बुद्धीचीच कास धर. म्हणजे तुझ्या कर्मात कुशलता येईल या कौशल्यालाच योग असेही नाव आहे म्हणून समत्व बुद्धीने कर्म करून ज्ञानी लोक कर्मापासून निर्माण होणाऱ्या फळाला दूर सारून जन्म बंधनापासून मुक्त होतात व दुःख रहित अशा स्थानाला प्राप्त होतात. जेव्हा तुझी बुद्धी मोहापासून उत्पन्न होणारी मलीनता दूर करील त्यावेळी ऐकणे व ऐकण्याचे विषय याबद्दल तुला विशेषता वाटणार नाही. अनेक प्रकारच्या मोहक भाषणाने श्रवण करुन गोंधळून जाणारी तुझी बुद्धी निश्चल होईल म्हणजे एकाग्रतेत स्थिर होईल. तेव्हाच हा समत्व योग तुला प्राप्त होईल.

**श्लोक ५४ ते ७२ स्थिर बुद्धी मानवाची लक्षणे.**

हे सारे ऐकून झाल्यावर अर्जुन कृष्णाला म्हणतो– हे केशवा, अशा प्रकारे स्थिर बुद्धीने स्थित झालेल्या माणसाचे लक्षण कोणते? तो कसा बोलतो? वागतो? हे सांग! श्रीकृष्ण म्हणतो, अर्जुना असा मनुष्य आपल्या मनात उत्पन्न होणाऱ्या सर्व कल्पनांचा त्याग करतो आणि आपल्या आत्म्याचे ठिकाणी संतोष अनुभवतो. तेव्हाच तो स्थिर बुद्धीचा बनतो. दुःखाने त्याचे मन उदास होत नाही, सुखावर त्याची दृष्टी खिळून राहात नाही. प्रेम (आसक्ती), भय आणि क्रोध यांच्यापासून तो अलिप्त असतो. त्यालाच स्थित प्रज्ञ म्हणावे. आसक्तीरहित मनाने वावरत असताना शुभ वा अशुभ प्राप्त झाले असता त्याला आनंद वा दुःख होत नाही त्याची बुद्धी सम राहाते. तोच स्थितप्रज्ञ होय. याला दृष्टांतच द्यावयाचे झाल्यास कासव आपले सर्व अवयव आवरून घेतो त्याचप्रमाणे हा पुरुष विषयापासून इंद्रियांना आवरून घेतो. या पुरुषाला स्थितप्रज्ञ म्हणतात. देहधारी मनुष्य विरक्त झाला असता विषय त्याच्यापासून दूर होतात.

परंतु विषयासंबंधीचा विचार उरतोच. ही मात्र ब्रह्मज्ञानानंतरच नाहीशी होते म्हणजे त्याचे मन निर्विचारी होते. हे अर्जुना अशा प्रकारच्या संयमी माणसालाही बलवान इंद्रिये खेचत असतात आणि त्यांना सर्वांशाने लगाम घालून चित्त माझ्या (परमात्म्याच्या) ठिकाणी लावावे तेव्हाच त्याला स्थिरबुद्धी प्राप्त होते. विषयांचे ध्यान करणाऱ्या मनुष्याला त्या विषयांच्या ठिकाणी आसक्ती उत्पन्न होते. आसक्तीतून कामना उत्पन्न होते, त्यापासून क्रोध उत्पन्न होतो. क्रोधामुळे विवेकहीनता उत्पन्न होते. विवेक नष्ट झाल्याने स्मृतीत गोंधळ निर्माण होतो. त्यामुळे बुद्धी नष्ट होते आणि बुद्धी नाशाबरोबर त्याचा संपूर्ण नाश होतो. परंतु ज्याचे मन स्वतःच्या स्वाधीन आहे. तो प्रेम वा द्वेष या भावनेने रहित असतो. असा माणूस सर्व इंद्रिय व्यापार करत असतानाही प्रसन्न राहतो. चित्त प्रसन्न राहिल्याने सुख दुःखे दूर होतात व बुद्धिही स्थिर राहते. योगाचा अभ्यास न करणाऱ्याची बुद्धी स्थिर होत नाही. त्याच्या ठिकाणी श्रद्धा भक्तीही असत नाही. श्रद्धाहीन मनुष्याला शांतता प्राप्त होत नाही. अशा अशांत माणसाला सुख तरी कोठून मिळणार? विषयामध्येच फिरणाऱ्या इंद्रियांच्या मागे जो धावू लागतो तेव्हा त्याची बुद्धी वाऱ्याबरोबर जाणाऱ्या पाण्यातील नावेसारखी होते. सर्व भूतमात्रांची रात्र असते तीत संयमी जागा असतो आणि ज्यावेळी सर्वभूत मात्रे जागे असतात ती या डोळस मुनींची रात्र असते. सर्व बाजूंनी पाणी भरले जात असतानादेखील म्हणजे समुद्रात नद्या प्रवेश करत असताना समुद्र अचल राहतो. त्याप्रमाणे सर्व विषय प्रवेश करीत असताना मुनी शांत राहातो. तोच खरी शांती अनुभवतो. मात्र विषयांच्यामागे पळणाऱ्याला शांती लाभत नाही. म्हणून जो सर्व कामना सोडून निस्पृह व अहंकार रहित होऊन व्यवहार करतो त्यालाच शांती प्राप्त होते. हे अर्जुना, हीच ब्रह्माला प्राप्त झालेल्या पुरुषाची स्थिती आहे. ही स्थिती प्राप्त झाल्यावर कोणीही मोहित होत नाही. अंतकालीसुद्धा हीच स्थिती राहून तो ब्रह्म निर्वाणाला प्राप्त होतो.

या अध्यायात मुख्यत्वे करुन सांख्य विचार मांडलेला आहे तो आपण पाहू.

कपिल सांख्य शास्त्राचा विचार करण्यापूर्वी सांख्य या शब्दाचे दोन भिन्न अर्थ होतात ते येथे सांगितले पाहिजे. पहिला अर्थ कपिलाचार्यांनी प्रतिपादलेला सांख्यशास्त्र हा असून या अध्यायात श्लोक ११ ते ३० इथे त्याचा उल्लेख आलेला आहे. सर्व प्रकारच्या तत्त्वज्ञानासही सामान्यतः सांख्य हेच नाव देण्याची वहिवाट असून त्यात वेदान्त शास्त्राचाही समावेश होतो. सांख्य हा शब्द सं + ख्या या धातूपासून निघाला असल्यामुळे त्याचा एक अर्थ मोजणारा असा होतो. कपिल शास्त्राप्रमाणे मूलतत्वे मोजकी पंचवीसच असल्याने त्यास मोजणारे या अर्थी सांख्य हे विशिष्ट नाव देण्यात आले. नंतर सांख्य म्हणजे सामान्यतः तत्त्वज्ञान हा व्यापक अर्थ बनला. गीतेत सांख्य शब्द आत्मानात्म विचाराने सर्व कर्माचा संन्यास करुन ब्रह्मज्ञानातच गढून राहणाऱ्या वेदान्त्याचा समावेश याअर्थी केलेला आहे.

**सांख्य शास्त्राचा पहिला सिद्धान्त –**

या जगात नवे असे काहीच उत्पन्न होत नाही. मूळ कारणात असलेले गुणच कार्यात परिणत होतात. बौद्ध व कणाद (वैशेषिक) कारणाचा नाश ही कार्याची उत्पत्ती मानतात. बीजाचा नाश अंकूर, अंकुराचा नाश, झाड. मात्र सांख्य आणि वेदान्ती यांना हे मत मान्य नाही. बीजातच वृक्ष बनण्याची मूळ द्रव्ये आहेत. जमीन, हवा, पाणी यांच्या साहायाने त्या बीजाचेच अंकूर व वृक्षात रुपांतर होते. कोणतेही कार्य घेतले त्याचे द्रव्यांश व गुण मूळच्या कारणात कोणत्या तरी रूपाने असले पाहिजेत असा सांख्यानी सिद्धान्त केला. या सिद्धान्तासच सत्कार्य वाद असे नाव आहे. कार्यातला कोणताही गुण कारणाबाहेरील गुणापासून उत्पन्न होऊ शकत नाही. कारणालाच कार्याचे स्वरूप प्राप्त झाल्याने त्या कार्यातील द्रव्यांश कर्मशक्ती यांच्या बेरजेचे मापही सदैव एकच भरते. नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते असतः। जे नाहीच ते कधीही

इंद्रियांची दृष्टी दोषयुक्त असल्याने जग तसेच दिसते.

अस्तित्वात येत नाही, मुळात सर्व वस्तूतील द्रव्य एकच–

सृष्टीत विविध पदार्थ गोचर होतात. त्यांची रूपे व गुणही निरनिराळे आढळतात. हा निराळेपणा मूळचा नसून मुळात सर्व वस्तूंतील द्रव्य एकच आहे असा सांख्यांचा सिद्धान्त आहे. आधुनिक विज्ञानही हेच मानतो. क्वाँटम थिअरीप्रमाणे साऱ्याच वस्तू एकाच तत्वापासून निर्माण झालेल्या आहेत. हे मान्य झाले आहे. जगातील सर्व पदार्थांचे जे हे मूलतत्व त्यास सांख्यशास्त्रात 'प्रकृति' असे म्हणतात. प्रकृति–मूळतत्व. या प्रकृतिपासून पुढे होणाऱ्या पदार्थास विकृती किंवा मूलभूत द्रव्याचे विकार (बदल modifications ) असे नाव देतात. मात्र सर्व पदार्थात गुण एकच नाही. सत्कार्य वादाप्रमाणे एकाच गुणापासून अनेक गुण निघणे शक्य नाही. म्हणून सांख्यांनी त्या गुणांचे सत्व, रज, तम असे तीन वर्ग केले आहेत. कोणताही पदार्थ घेतला असता एक शुद्ध–पूर्णावस्था, एक अशुद्ध निकृष्टावस्था अशा दोन अवस्था आढळतातच. निकृष्ट अवस्थेतून पूर्णावस्थेकडे जाण्याची प्रवृत्ति त्यांच्यात आढळते. म्हणून शुद्धावस्थेस 'सात्विक' निकृष्ट अवस्थेस 'तमस' व प्रवर्तकावस्थेस 'राजस' अशी विशेषणे देऊन प्रत्येक पदार्थाच्या ठिकाणी 'सत्व, रज, तम' हे तीन गुण मूलभूत द्रव्यात म्हणजे– प्रकृतीत प्रारंभापासूनच आहेत, असे सांख्यांचे म्हणणे आहे. किंबहुना हे तीन गुण म्हणजेच 'प्रकृति' होय. प्रथमतः या तीनही गुणांचा जोर सारखाच असल्याने त्यांच्या ठिकाणी साम्यावस्था आढळते. ही अवस्था जगाच्या आरंभी होती. जगाचा लय झाला असता पुनः होईल. मूळ प्रकृतीतील रजोगुणामुळे प्रवृत्ती निर्माण झाली असता सृष्टीला आरंभ होतो. ही प्रवृत्ती प्रकृतीच्या अंगच्या गुणामुळेच होते, असे सांख्यांचे म्हणणे आहे. या गुणापैकी ज्ञान वा जाणीवपणा हे सत्वाचे लक्षण,जाणीव व नेणीवपणा हा तमाचा धर्म. रजोगुण हा प्रवर्तक, चांगल्या वा वाईट कार्याला प्रवृत्त करणारा हा रजोगुण. हे तीन गुण कधी निरनिराळे असू शकत नाही. सर्व पदार्थात या तिहींचे कमी अधिक मिश्रण असते. या कमी अधिक मिश्रणामुळेच मूळ द्रव्य एक असताना गुण भेदाने विविध पदार्थ, सोने, लोखंड, माती, पाणी, आकाश, मनुष्य, शरीर आदि निराळे विकार होत असतात. सात्विक पदार्थात रज आणि तम अल्प प्रमाणात आढळतात. म्हणजेच निव्वळ सत्वगुणी, निव्वळ रजोगुणी, निव्वळ तमोगुणी पदार्थच असू शकत नाहीत. त्यात जो गुण प्रबळ, त्याप्रमाणे तो पदार्थ.

**प्रकृती अव्यक्त**

साम्यावस्थेत असणारी मूळ प्रकृती अव्यक्त म्हणजे इंद्रियाना अगोचर आणि जे गोचर होते म्हणजे आपण पहातो, ऐकतो, चाखतो, स्पर्श करतो, त्यास व्यक्त असे सांख्य म्हणतात. मूळ प्रकृती एक असताही हे नानात्व कसे उत्पन्न होते याचा जो विचार त्यास विज्ञान म्हणतात. यातच सर्व आधिभौतिक शास्त्रांचा समावेश होतो. रसायन, पदार्थ, विद्युत् आदि शास्त्रे म्हणजे विविध ज्ञाने ही विज्ञानेच होत.

स्थूल सूक्ष्म – काही व्यक्त पदार्थ स्थूल व काही सूक्ष्म, मन, बुद्धि आकाश वगैरे. स्थूल व सूक्ष्मावरुन वस्तूची शरीर घटना कशी आहे हे समजते. सूक्ष्म म्हणजे अव्यक्त असा अर्थ होत नाही. हवा सूक्ष्म परंतु स्पर्शेंद्रियास तिचे ज्ञान होते. मूळ प्रकृति ही हवेपेक्षाही सूक्ष्म, इंद्रियांना न कळणारी म्हणून अव्यक्त. परंतु सत्कार्य वादाप्रमाणे इंद्रियांना प्रत्यक्ष न भासले तरी सूक्ष्म रूपाने कारण अस्तित्वात असलेच पाहिजे असे अनुमानाने सिद्ध होते असे सांख्य मानतात. वेदान्तीही हाच कोटिक्रम ब्रह्म अस्तित्व सिद्ध करण्यासाठी वापरतात.

**सांख्य व वेदान्ती विचार यांतील फरक**

प्रकृतिमध्ये परमाणुरुप, अवयवभेद नसून ती सदैव एकाला एक लागून किंवा एकसारखीमध्ये किंचितही खंड न पडता अव्यक्त व निरवय रुपाने सर्वत्र भरलेली आहे. परब्रह्माबद्दल वेदान्ती हेच म्हणतात. त्यांच्यात एक फरक मात्र फार मोठा आहे. प्रकृति जड, सगुण तर परब्रह्म चैतन्यरूपी निर्गुण. या अव्यक्ताला अक्षर व व्यक्ताला क्षर

अशा सांख्यांच्या दुसऱ्या संज्ञा आहेत. क्षर म्हणजे व्यक्त स्वरूपाचा नाश एवढाच अर्थ आहे. साम्यावस्था मोडली असता सृष्टी निर्माण होते यालाच वेदान्ती माया असे म्हणतात.

## प्रकृति व पुरुष विचार

या अव्यक्त प्रकृतिपासूनच बुद्धि अहंकार वगैरे विकार उत्पन्न होतात असे सांख्य मानतात. ज्ञाता हा प्रकृतिहून भिन्न त्याला ते पुरुष म्हणतात. प्रकृति अचेतन (जड) पुरुष सचेतन (ज्ञाता) प्रकृति खटाटोप करणारी, पुरुष उदासीन (द्रष्टा) ही दोन भिन्न तत्त्वे या सृष्टीत अनादि सिद्ध, स्वयंभू आहेत. 'प्रकृतिं पुरुषं चैव विद्धि अनादि उभावपि।' गीता १३-१९ कार्यकरण कर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते। पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते। १३.२० देह इंद्रिये यांचे व्यापार प्रकृती करते. सुख दुःखाच्या उपभोगास पुरुष कारणीभूत होतो. गीता प्रकृती व पुरुष ही तत्त्वे स्वतंत्र आहेत असे मानीत नाही. गीता 'प्रकृतिस' ईश्वराची माया म्हणने पुरुष म्हणजे माझा अंश असे सांगते 'ममैवांशः सांख्य प्रकृति व पुरुष ही दोन तत्त्वे स्वतंत्र मानीत असल्याने त्यास द्वैती असे म्हणतात.

जड प्रकृती व सचेतन पुरुष यांचा संयोग झाला असता सृष्टीतील कर्मे सुरू होतात. प्रकृतीच्या या नटनात पुरुष भुलून जातो. आणि स्वतःला गुंतवून घेतो. तोवर त्याला मोक्ष म्हणजे सुख दुःखापासून सुटका नाही. पण कालांतराने त्याला स्वरूपाचे भान होते व तो मुक्त होतो. असे सांख्य मानतो. प्रकृतीच पुरुषापासून वेगळी होते. मोक्ष ही पुरुषाची अवस्था नाहीच. 'एतत् बुद्ध्वा बुद्धिमान स्यात्' पुरुष म्हणजे असंख्य पुरुषांचा समुदाय हा सांख्यांचा अर्थ आहे. हे असंख्य पुरुष व त्रिगुणात्मक प्रकृती यांच्या संयोगामुळे सृष्टीतील सर्व व्यवहार चाललेला आहे.

## प्रकृती – विकृती – सृष्टिक्रम

प्रकृतीपासून महत् म्हणजे बुद्धी निर्माण होते. त्यातून पृथक् म्हणजे अहंकार निर्माण होतो. इथे प्रकृतीचा एकजिनसीपणा मोडून अनेक पदार्थ बनू लागतात. या अहंकारापासून एक निरींद्रिय सृष्टी-झाडे इत्यादि व दुसरी सेंद्रिय सृष्टी म्हणजे प्राणी, मनुष्ये आदि. सेंद्रिय सृष्टि श्रेष्ठ म्हणून सत्वगुणांच्या उत्कर्षाने होणारी, निरींद्रिय सृष्टी तामस म्हणजे तमोगुणाच्या उत्कर्षाने होणारी अशी नावे आहेत. अहंकार आपल्या शक्तीने कधी सत्व गुणाच्या उत्कर्षाने, निरींद्रिय सृष्टी तमोगुणाने - अनुक्रमे पांच ज्ञानेंद्रिये, पांच कर्मेंद्रिये व मन मिळून अकरा इंद्रिये, तसेच निरींद्रिय सृष्टीची पांच तन्मात्र द्रव्ये उत्पन्न करतो. थोडक्यात प्रकृति मूळ एकरूप होती. तिने व्यापक व्हावयाचे ठरविले (बुद्धि) व वेगळी झाली (अहंकार ) म्हणजे विविध झाली. या प्रमाणे वेगळेपणातही दोन भाग झाले. एक सेंद्रिय व एक निरींद्रिय सेंद्रिय घटक - ११ (अकरा) व निरींद्रिय घटक ५ (पांच) असे झाले. अर्वाचीन शास्त्रज्ञ-पदार्थाचे तीन प्रकार मानतात. घन, द्रव व वायुरूप, त्यांच्याही पुढे सांख्य मानतात. या सर्व वर्गीकरणाचे ज्ञान पाच ज्ञानेंद्रियामुळे होते. या इंदियाला प्रत्येकी एकच गुण कळत असतो. त्यांचे पाच विषयही ठरले आहेत. शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध, रूपात विविधता असली तरी रूप हे तत्व एकच. पदार्थाचे मूळ गुण पाचच आहेत. या पंच तन्मात्रापासून पंचमहाभूते निर्माण झाली.

थोडक्यात प्रकृति-महत् वा बुद्धि-अहंकार (व्यक्त व सूक्ष्म) सात्विक पांच ज्ञानेंद्रिय + पांच कर्मेंद्रिये + मन, तामस-पंचतन्मात्रा-पंचमहाभूते (स्थूल सूक्ष्म) व पुरुष

१-प्रकृति १-महत् १-अहंकर ११-ज्ञानेंद्रिय, कर्मेंद्रिये व मन, ५ तन्मात्रा, ५ महाभूते व १-पुरुष मिळून २५ तत्त्वे.

अव्यक्त प्रकृती 'बी' बुद्धी-खोड, अहंकार-पल्लव, दहा इंद्रिये व मन-आतल्या डहाळ्या, पंचतन्मात्रे-मोठ्या शाखा, महाभूते आडशाखा - असा पुरातन मोठा ब्रह्म वृक्ष याला तत्त्वानुरुप तरवारीने छेदून ज्ञानी पुरुषाने जन्म जरा मृत्यू उत्पन्न करणारे पाश तोडावे. ममत्व बुद्धि अहंकार

याचा त्याग करावा व मुक्ती प्राप्त करुन घ्यावी. हा ब्रह्म वृक्ष म्हणजेच संसृतीचा पिंगा, मायेचा पसारा. उपनिषदात यालाच सनातन अश्वत्थ वृक्ष असे म्हटले आहे. वृक्षाचे मूळ परब्रह्म (वर) आणि शाखा ह्या सृष्टीचा पसारा (खाली) हे वैदिक वर्णन आणि सांख्य तत्त्वे यांची जोड घालून गीतेत अश्वत्थ वृक्षाचे वर्णन आले आहे.

### वेदान्ती विचार सरणी

वेदान्ती प्रकृतीला मूळ न मानता ती परमेश्वरापासूनच निर्माण झाली आहे. सृष्टी उत्पत्तीचे वर्णन करताना वेदान्ती परमेश्वरापासून एकाबाजूने जीव तर दुसऱ्या बाजूने महदादि विकृति सात + प्रकृति मिळून आठ प्रकारची अपरा–भूमि आप जल वायु आकाश मन, बुद्धी मन व अहंकार (अपरा प्रकृति) तर जीव ही परा एवढी नऊच तत्त्वे मानतात. अपरा–भूमिरापोऽनलो वायु खं मनो बुद्धि रेव च। परा जीव– सांख्य ज्याला पुरुष म्हणतात त्यालाच वेदान्ती जीव म्हणतात. जीव हा ईश्वराची परा प्रकृति थोडक्यात वर्गीकरण अशाप्रकारे होईल.

### सांख्य वर्गीकरण

न प्रकृतिः न विकृतिः पुरुषः प्रकृतिः विकृतिः प्रकृति. बुद्धिःअहंकार, पंचणन्मात्रे विकृति. मन, पांच ज्ञानेंद्रिये ५ कर्मेंद्रिये व पांच महाभूते.

### वेदान्ती वर्गीकरण

परब्रह्माचे श्रेष्ठ स्वरूप, परब्रह्माचे कनिष्ठरूप (आठ प्रकार) १६ विकार वेदान्ती मानीत नाहीत.

### गीतेचे वर्गीकरण

पराप्रकृति, अपरा प्रकृति (आठ प्रकार) मूलतत्वात गणना नाही.

आर्य तत्त्वज्ञानात सांख्य आणि योग हे दोन तत्त्वज्ञानाचे मार्ग विशेष महत्त्वाचे आहेत. सांख्य शास्त्र प्रवर्तक कपिल महामुनि ही आपलीच विभूति आहे असे गीतेत सिद्धानां कपिलो मुनिः। (१०.२०) या श्लोकात श्रीकृष्णांनी सांगितले आहे. गीतेच्या दुसऱ्या अध्यायाचे नांवच सांख्ययोग असे आहे. गीतेच्या उपदेशाला या अध्यायापासून सुरुवात होत आहे. ११ ते ३० श्लोकापर्यंत सांख्य तत्त्वज्ञान सांगितले आहे.

### आत्मानात्म विचार

सम्यक् ख्यायते, युक्ति प्रयुक्तीने उत्तम प्रकारे समजाऊन दिले जाते. त्याला सांख्य म्हटले आहे. गीतेत अनेक प्रकारे याचे वर्णन आले आहे. सर्वगतः (२.२४) आत्मा एक आहे, तो सर्व व्यापक आहे, सर्वगत अणूरेणूत अंतर्बाह्य व्यापून राहिला आहे. अचल – ( २.२४) सर्व व्यापकत्वामुळे अचल, न बदलणारा. सर्वत्रच असल्याने तों एका स्थानापासून दुसरीकडे जाऊच शकत नाही. कारण तो नाही असे स्थानच नाही. आत्मा एकच व सर्व व्यापक आहे. देह विनाशी आत्मा अविनाशी. अन्तवन्त इमे देहाः नित्यस्योक्ताः शरीरिणः। (२.१८) नित्य अशा आत्म्याचे नाशवंत अनेक देह आहेत. त्यामुळे देही नित्यं – हा नित्य आत्मा 'सर्वस्य देहे' सर्वांच्या हृदयात आहे. अहं आत्मा सर्वभूताशयस्थितः (१०.२०) अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमास्थितः (१२–१४). आत्मा एक तर एकाचे सुख दुःख दुसऱ्याला का नाही होत? या शंकेचे उत्तर गीतेने दिले नसले तरी उपनिषदे सांगतात. जागृतीत द्वैताचा अनुभव, मात्र सुषुप्तीत समाधियुक्त आदि अवस्थेत एकत्वाचा, अद्वैताचा अनुभव शास्त्र व सामान्य माणूस यांच्या अनुभवात खूप तफावत आढळते. (याचे व्यावहारिक उत्तर असे देता येईल अहंकार भेद बुद्धिभेद याप्रमाणे प्रत्येकाचे अनुभव भिन्न होतात. वीज एकच असताना – गीझर, हीटर, पंखा, बल्ब, फ्रीजर इथे त्या उपकरणाप्रमाणे शीत वा उष्णतेचा फरक जाणवतो हेही त्याच प्रमाणे जाणावे.)

नित्यः हा शब्द अनेक ठिकाणी आढळतो एक सारखा सदा राहणारा पहा २/१८,२०,२३,२४,२६,३०. शाश्वत

कीर्तनामुळे माणसाची वाणी तर श्रवणामुळे कान तृप्त होतात.

२/२० सनातन २/२० सदा असणारा – सर्व ठिकाणी विद्यमान हा अर्थ . अज २/२०, २३ हा अजन्मा, उत्पन्न होत नाही – न जायते अनाशी २/१८ अविनाशी २/२१ अव्यय २/२१ नित्यं अवघ्यः २/३० अच्छेद्यः २/२४ नाश होत नाही, व्यय होत नाही, न्यून्य अधिकच होत नाही. वध होत नाही न म्रियते न हन्यते। नैनं छिन्दन्ति शस्त्राणि – २/२३ याला शस्त्र कापू (तुकडे) करू शकत नाही. यावरून आत्मा अमर आणि अजन्मा असल्याचे ध्यानात येते.

भूत्वा अभविता न । एकदा शरीर धारण केल्यानंतर पुनः शरीर धारण करणार नाही असे नाही.

पुराण – पुरा आणि नवः जुना परंतु नव्यासारखा ताजे तवाना केव्हाही वृद्ध होत नाही नित्य युवा. जीर्ण देह टाकून नवीन देह धारण करत असल्याने नित्य नूतन राहतो.

अदाह्य : अक्लेद्यः अशोष्यः २/२४ हा जळत नाही, ओला होत नाही, सुकत नाही थोडक्यात महाभुतांचा परिणाम होत नाही. यालाच अविकारी म्हणतात. अविकार्योऽयं उच्यते।२.२५

स्थाणुः स्थिर न घडणारा, न बदलणारा, विकृत न होणारा, सर्वांना आधार देणारा.

अव्यक्त अचिन्त्य – अगोचर, चिंतन करण्याच्या पलीकडे. आत्मा असा विलक्षण आहे. त्यामुळे याच्याबद्दल आश्चर्य वाटते. आश्चर्यवत् पश्यति। याचे ज्ञान तत्ववेत्याला होते. परंतु त्यालादेखील ते दुसऱ्याला समजावून सांगता येत नाही. तो स्व संबंध–स्वतःच स्वतःला जाणण्या योग्य असा आहे.

तत्त्वविचार – जो आत्मा माझ्यात आहे तोच किडा मुंगीपासून सर्व प्राणी मात्रात आहे. हे तत्त्व स्वीकारल्यास तात्विक दृष्ट्या आत्मिक एकता असल्याचे ध्यानात येते. जर मी कोणाची हिंसा करीन तर ती माझीच हिंसा होईल. म्हणजे कोणताही अत्याचार परका समजून केल्यास तो आपणावरच उलटणार म्हणून विविधता पाहणे अयोग्य. कौरवांना तू मारत नाहीस ते स्वतःच्या कर्मानीच मरणार आहेत. मी वेगळा समजून होणारी प्रत्येक वागणूक हे अज्ञान मूलक आहे. यामुळेच मनुष्य अपप्रवृत्तीकडे वळतो. आपल्या अत्याचाराने मी माझेच दुःख वाढवीत आहे हे समजल्यास निःसंशय तो चांगले वागेल.

सुख दुःख समानता – सुख दुःख यांच्या समान मानणे. सुख दुःखे समेकृत्वा । २/३८ सुखाला जवळ व दुःखाला दूर लोटण्याचा प्रयत्नच मनुष्याकडून होतो याच कारणासाठी तो अत्याचारी बनतो शुभावर प्रेम आणि अशुभाचा द्वेष न करणे असे घडल्यास मनुष्य आनंद प्राप्त करुन घेतो. द्वंद्वांना समान मानावे म्हणजे काय? कोणत्याही गोष्टी विषयी अधिक स्नेहभाव धरू नये. सुखात आनंदाने नाचू नये. दुःखात खचू नये. यालाच सुख दुःख समान मानणे म्हणतात. मानवाने सुखासाठी प्रयत्न करावा मात्र सुख प्राप्तीने कर्तव्य भ्रष्ट होऊ नये व दुःख झाले असता हताश होऊन कर्तव्यच्युत होऊ नये. सुखदुःख क्षणिक, कर्तव्य पालन सदाचे व श्रेष्ठ. समयाचा अर्थ परब्रह्म असाही आहे. सुखदुःख सम म्हणजे परब्रह्मच आहे.

व्रतपालन करणाऱ्या लोकांना द्वंद्वाविषयी समभावना ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. नाहीतर व्रतभंग होण्याचा धोका अधिक. द्वंद्वे सहन केली पाहिजेत. उन्नतीसाठी दुसरा मार्ग नाही. आपण इच्छा करण्याची वा न करण्याशी सुख दुःखाचा संबंध नाही. इच्छा केली नसताही दुःख प्राप्त होते. इच्छा करूनही सुख मिळत नाही. समानता मानणारा मनुष्य आपली मनस्थिती कायम ठेवितो. ज्याला आपण सुख वा दुःख म्हणतो ते वस्तुतः सुखही नसते, दुःखही नसते. विद्यार्थी खेळण्यात सुख शिकण्यात दुःख मानतो. त्याला त्यावेळी अनुभवही तसाच येतो. खरे पाहता वस्तुस्थिती तशी नाही. दुःखातच उत्थानाची बीजे आहेत. सुख वा दुःख एक अवस्था आहे. सर्वत्र सम राहिल्याने उन्नती शक्य. दोन्हीतही परमेश्वरच आहे हे सदोदित लक्षात ठेवावे.

मनुष्याच्या ठिकाणी एकच कामना असते मला सुख मिळावे, दुःख माझ्यापासून दूर जावे. हीच कामना मनुष्याला सर्वप्रकारे द्वंद्वांच्या जाळ्यात अडकविते. विहाय कामान् यःसर्वान्‌–सशान्तिं अधिगच्छति।२.७१ सर्व कामनांचा त्याग, निरिच्छता, अहंकार रहितता याने शांती प्राप्त होते. बाह्य पदार्थापासून संतोष होतो हा भ्रम आहे. बाह्य विषयापासून मन दूर झाल्याने मनाला कोणतीही कामनाच करावी लागत नाही. भोग आपणहून चालत येतात. नद्या समुद्राकडे धाव घेतात त्याप्रमाणे कामाः आपूर्यमाणं अचल प्रतिष्ठं प्रविशन्ति। २/७० जो स्वतःच पूर्णतेचा अनुभव घेतो. आपल्या कर्तव्याच्या ठिकाणी स्थिर राहतो. त्याच्याजवळ सर्व काम, सर्व भोग, स्वतःहून येतात.

योग मार्ग – योगाची व्याख्या – सिद्धय सिद्धयोः समोभूत्वा समत्वं योग उच्यते।२.४८

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृत दुष्कृते। तस्मात् योगाय पुज्यस्व योगः कर्मसुकौशलम्। २.५०

सिद्धी वा असिद्धी या विषयी सम भाव ठेवला पाहिजे या समानतेला योग असे म्हणतात. सम बुद्धीने युक्त असलेला सुख व दुःख या दोहोनाही दूर सारतो म्हणून तू या योगाचे आचरण कर. कर्म करण्यातील कौशल्याला योग म्हणतात. सर्व कर्मे करण्याच्यावेळी याचे स्मरण ठेविले पाहिजे. सुख दुःखाचा विचार दूर सारून कर्तव्य केले पाहिजे. आपल्या कर्तव्याच्या ठिकाणी सदा स्थिर राहणे हाच योग आहे. समबुद्धी याचा अर्थ परमेश्वराच्या ठिकाणी स्थिर बुद्धि असाही होतो. सम शब्दाचा अर्थ परब्रह्म असा आहे. समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम्।

कर्मयोग – सुवर्ण नियम – मनुष्याचा अधिकार कर्म करण्यापुरता आहे.फलावर केव्हाही नाही कर्माच्या फलाचा हेतू मनात धरणे अनुदार वृत्तीचे द्योतक आहे. हा नियम हृदयात स्थिर करावा कर्माशिवाय माणूस राहूच शकत नाही. मग श्रेष्ठ प्रकारचे कर्तव्य कर्म का करू नये? कर्माचे फळ भविष्यात प्राप्त होणार आहे. आम्रवृक्षाची फळे पुढच्या पिढीला मिळेल. आम्रवृक्ष लावण्याचा अधिकार बजाविला हेच योग्य. घर बांधणे हे अधिकारातले, त्यात नांदणूक होणे अधिकरातले नाही. कारण ते इतर अनेक गोष्टींवर अवलंबून असते. पाठशाळा चालविली, विद्यार्थ्यांना शिकविले हे अधिकारातले, विद्यार्थ्यांना पूर्ण विद्वान् बनविणे हे अधिकारातले नाही. यावरून फलाचा संबंध इतर अनेक गोष्टीवर अवलंबून असतो. म्हणून गीता सांगते तुला कर्म करण्याचा अधिकार आहे. ते तू योग्य रीतीने पार पाड. फळाची अपेक्षा वा त्यावरील अधिकार हा अप्रस्तुत आहे. केवळ फळावरच नजर ठेवून कर्म करणे अयोग्य होय. मनुष्याच्या ठिकाणी फळाची जी अपेक्षा असते ती स्वार्थ मूलक असते. मी कर्म करतो. त्याचे फळ मला मिळाले पाहिजे. त्याचा उपभोग घेऊन मी अधिक सुखी होईन. या वृत्तीने केलेली सर्व कर्मे बंधनकारक होतात. स्वार्थ एका व्यक्ती पुरताच मर्यादित राहतो. संपूर्ण मानव कल्याणाच्या दृष्टीने इथे विचार राहात नाही. असा विचार केल्यासच हीच कर्मे निर्दोष होतात. विश्वरूपाची पूजा हीच होय. या वृत्तीत कर्म फलाची भावना असत नाही. कर्म न करण्याकडे पण प्रवृत्ती नसावी. अन्यथा आळशी होशील. कर्म करण्याची कुशलता पण नष्ट होईल. म्हणजेच अधोगति होईल. निश्चयात्मक बुद्धी हीच श्रेष्ठ अन्यथा अनिश्चित बुद्धी कोणत्याही मार्गाला प्रवृत्त करून अधःपाताकडे नेईल. यापासून सावध राहणे आवश्यक.

सांख्य व योग हे दोन पृथक् न मानता ते एकच आहेत. हा विचार महत्त्वाचा आहे. हे दोन मार्ग भिन्न नाहीत एकच आहेत असे गीतेचे सांगणे आहे.


**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे – ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३२०३०

●●●

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*पुढील विषयाचा निर्देश करणारा श्री. साने यांच्या मालिकेतील हा पुढचा लेख - संपादक*

## प्रास्ताविक



**श्री. यशवंत साने**

मी स्वत: दीनदयाळ प्रेरणा केन्द्र ह्या संस्थेचा एक सक्रिय कार्यकर्ता आहे. ही संस्था व 'एकात्म विचार केन्द्र' यांच्यातर्फे 'एकात्म मानव दर्शन विचार संमेलन' हे रविवार ता. १०-२-२०१३ रोजी ठाण्यात आयोजित करण्यात आले.

त्या निमित्ताने काही स्फुट विचार आज ह्या लेखात मांडणार आहे.

## अस्वस्थ व दिशाहीन देश

दिशाहीन परिस्थिति आलेली आहे व त्यांत भारतातील समाज होळपळून गेला आहे. आर्थिक, राजकीय, सामाजिक विचार प्रवाहावर चालणाऱ्या ह्या देशाला काही आशा देणारा मार्ग सापडत नाही आहे, असे स्पष्ट दिसत आहे.

## परतंत्र नेतृत्व

ह्याचे अगदी थोडक्यात विश्लेषण करावयाचे झाल्यास देशातील सध्याच्या नेतृत्वाकडे फक्त पाश्चात्य देशातील संस्कृतीवर आधारलेले अशा फक्त दोन विचार प्रवाहांचा विशेष व एकांगी अंमल आहे असे दिसेल!!

ते विचार म्हणजे 'साम्यवाद' व 'भांडवलशाही' हे होत. पण ह्या विचार किंवा तत्वज्ञानाचे मूळ स्वरूपही अत्यंत विकृत स्वरूपात व अनैतिक स्वरूपात जगात बोकाळलेले दिसून येत आहे. Crony Capitaliam ह्या तऱ्हेचे नामाभिधान असणाऱ्या संकल्पनावर आधारित राज्यपद्धती आज (India) म्हणजे भारत देशातच नव्हे तर जगभर राबवली जात आहे. इंडियात तर, रशिया व चीन या साम्यवाद स्वीकारलेल्या क्रांतिकारक मार्गावरून विचलित आणि पराभूत होऊन गेलेल्या समाजशास्त्राचा, राज्यशास्त्राचा जवळजवळ कुठल्या न कुठल्या भ्रष्ट स्वरुपांत असलेल्या भांडवलदारी Capitalism चा स्वीकार करत राज्यकर्ते चालत आहेत.

## दीनदयाल यांचा यक्ष प्रश्न

ह्या परिस्थितीचे संपूर्ण वर्णन येथे करणार नाही. पण पंडीत दीन दयाळ उपाध्यायजी यांनी जो प्रश्न उपस्थित केला होता त्यावर काहीही विचार होताना दिसत नाही. असा विचार खरे तर सर्वतऱ्हेच्या राज्यशास्त्रीय पंडीतांनी करावयाला हवा होता.

हा प्रश्न होता की 'कम्यूनिझम व कॅपिटलाझम' ह्या दोन राजकीय तत्वज्ञानाखेरीज काही तिसरा राज्यशास्त्रीय विचार भारतात आहे की नाही. समाजाच्या ह्या पृथ्वीवरील जीवनाला त्याच्या सांस्कृतिक प्रवासाला संदर्भ देऊन व वैश्विक जीवन प्रवाहाच्या धारेत काही आखीव व सुयोग्य राज्यशास्त्रीय विचार आहे की नाही.

या विचारधारेत पं दीन दयाळ उपाध्याय यांनी एकात्म मानव दर्शन "Integral Humanism" हा सैध्दांतिक मांडण्याचा प्रयत्न केला, त्याचे बहुरंगी दर्शन देवेन्द्र स्वरूप व अनेक इतर विचारवंतानी मांडले आहे. त्यावरून असे दिसते कीं केवळ भारतीय जनसंघाने A. B Pratinidhi Sabha ह्या भारतीय जनसंघ पक्ष शाखेने ह्याचा स्वीकार

वासना हे सर्व गोष्टींचे मूळ आहे.

वा स्वागत केले होते. (२३-२५ जानेवारी, १९६५)

**दैशिक शास्त्राचे आदर्श राज्यशास्त्र :**

मला ह्या संबंधात श्री १०८ सोंबारी महाराज ह्यांच्या विचारावर आधारित श्री तुलधारिया ह्यांनी लिहिलेल्या ''दैशिक शास्त्राचा'' विचार जास्त प्रभावी व भारतीय संस्कृती व अध्यात्म ह्यावर आधारलेला वाटला. त्या रोखाने काही विचार मांडावयाचे आहेत.

हे सांगण्याचे कारण म्हणजे भारतीय संस्कृतीतील 'सनातन धर्म या वैश्विक सृष्टी सृजन क्रियेत अंगीभूत असलेल्या नियमांवर व तत्वांवर आधारलेला जो कायदा (Law) त्याचा विस्तार पूर्वक संपूर्ण समावेश 'एकात्म मानव वादात' दिसला नाही.

एव्हढेच नव्हे तर ''देश, चिती, जाति, राष्ट्र, विराट'' ह्या शब्दाचा जो पारिभाषिक सत्य अर्थ जाणला जातो त्या वैश्विक निर्मीतीतील सत्य व ऋत तत्वांशी व भौतिक किंवा प्रत्यक्ष ''व्यक्त'' (Manifest world) पुरुषसूक्त ह्यांतील Structural वस्तुस्थितीवर तो धर्म व ह्या नवीन संकल्पना कशा आधारलेल्या आहेत, त्या स्पष्टपणे व निसंदिग्ध रीतीने मांडल्या व जाणल्या गेल्या नाहीत, असे मनोमन वाटते.

**सेक्यूलर संन्यास?**

त्यामुळे मुख्य धक्का बसला तो हा की असा भास होतो की हे राज्यशास्त्र – दैशिक राज्यशास्त्र हे जणू काही एका Religion हिंदू धर्मावर व श्रद्धा (Faith) वर आधारलेले आहे. व जणूकाही इतर धर्म व प्रत्यक्ष व्यवहारात असलेली धर्मनिरपेक्ष, धर्मविरहित Secular सेक्यूलर राज्यशास्त्रे व पद्धती ही ह्या वैश्विक सनातन (Eternal) निसर्ग यंत्रणेपासून मुक्त व स्वतंत्र आहेत? हिंदूंनी त्यांच्या वैदिक सत्यदर्शनाशी त्याचा संबंध जोडू नये. तसे झाल्यास त्यांना ह्या जगातील सर्वमान्य सेक्यूलर राज्ययंत्रणेतून संन्यास घ्यावा लागेल विशेषत: भारतात ज्या राजकीय पक्षांना आपल्या देशात जे मूलगामी बदल व व्यवस्था बद्दल हवे आहेत असे वाटते त्यांना 'भारतीय राज्यघटनेत (Secular Constitution and Parliamentary System) यातील खरे बौद्धिक आध्यात्मिक व भौतिक समन्वयी लोकशाही नैसर्गिक हक्क मिळणार नाहीत.

**राजकीय पक्षांवर निर्बंध कोणते?**

त्यामुळे, भारतीय जनता पक्ष व इतरही पक्षांनी ही राज्यघटनेची मर्यादा मान्य करुन 'एका भ्रष्ट, ध्येयहीन व मानवी अस्तित्वाच्या वैश्विक आध्यात्मिक व नैतिक हक्कांना, अभीप्सांना (Aspiration) तिलांजली देऊन प्रत्यक्षात ह्या देशातील बेगडी लोकसत्तेच्या राज्ययंत्रणेच्या बदलण्याच्या खेळांत भाग घ्यावयाला सुरूवात केली.

हा बदल केवळ भारतीय जनता पक्ष नव्हे तर कम्यूनिस्ट पार्टी (डावी व उजवी) ह्या साम्यवादी पक्षांनी सुद्धा ह्या खेळाच्या संकुचित व वैश्विक सत्य दर्शनाला दुर्लक्षून एकांगी भौतिकवादी व भ्रष्ट व Corrupt होणाऱ्या लोकशाही पद्धतीतील खेळात भाग घेतला.

**भारतीय आदर्शवादांचा अव्हेर**

मला हे दृश्य हा भारतीय संस्कृतीतील आदर्शवादाचा अव्हेर करणारे वाटले.

त्यामुळे, मी दिशाच्या अंकात ऑक्टोबर २०११ पासून मार्च २०१२ च्या अंकातील ६ लेखांची एक पुस्तिका आपल्या Perfect Prints चे मालक श्री सांगुर्डेकर यांच्या सौजन्याने खाजगी वितरणासाठी प्रिंट करून घेतली त्या पुस्तिकेला मोहन पाठक ह्यांनी मदत केली व डॉ. विजय बेडेकर ह्यांनी त्यावर उपोद्घात लिहून माझ्या लेखनाचे थोडक्यात महत्त्व विशद केले. ह्या सर्वांचा मी आभारी आहे व 'विद्या प्रसारक मंडळ' ह्या संस्थेचाही ऋणी आहे.


पण, दिशाच्या नेहमीच्या वाचकांना हा **'उपोद्घात'** वाचावयाला मिळावा म्हणून मी या अंकात तो छापत आहे.

इंद्रियदमन करायचे असेल तर आहार थोडा कमी करावा.

## उपोद्घात

'एकात्म मानव दर्शन विचार' या संमेलनाच्या निमित्ताने विद्या प्रसारक मंडळाच्या दिशा या मासिकात प्रकाशित केलेले सहा लेख या पुस्तिकेत आहेत.

हा विचार अतिशय गहन व गंभीर आहे. भारतीय संस्कृतीतील राज्यशास्त्र, त्याची आध्यात्मिक समाज व्यवस्था आणि या संदर्भातील वैदिक शास्त्राची क्षमता व व्याप्ती या अनुषंगाने संभवणाऱ्या अनेक मुद्यांना श्री. साने यांनी या लेखांत स्पर्श केला आहे. राजकारण, समाजकारण, सांस्कृतिक चळवळ व भौतिक विचार यांचे नाते संबंध खूप गुंतागुंतीचे आहेत.



डॉ. विजय वासुदेव बेडेकर

आधुनिक भौतिकवादी विज्ञानाला या व अशा प्रश्नांचे वावडे असल्याने ते हा शोध अंगाबाहेर टाकून मोकळे झाले. मानवाच्या अस्थिरतेतूनच अशांतता, असंतुष्टता, भोगल्यास यामुळे संघर्ष निर्माण होतो व गोंधळसदृश परिस्थिती होते. श्री. साने या लेखांच्या निमित्ताने अनेक ग्रंथाचे लेखकांचे अवगाहन करीत आहेत. त्यामुळे सदर लेखमालेस अभ्यासमूल्य प्राप्त झाले आहे. स्वामी दयानंद, योगी अरविंद, भगवद्गीता, लोकमान्य टिळक, इवान पावलाव थॉमस हॅरिस व अशा अनेकानेक लेखकांची अवतरणे, दृष्टिकोन अभ्यासाच्या संदर्भात त्यांनी दिली आहेत. त्याचबरोबर प्रचलित राजकीय, सांस्कृतिक वृत्तापत्रीय साहित्याचाही ते वापर करतात.

'एकात्म मानव दर्शन विचार' या मुळात गहन विषयावर चर्चा होत असतानाच श्री. यशवंत साने यांचे सर्व लेख एकत्रितपणे वाचकांना मिळत आहेत ही आनंदाची बाब आहे. तिचा या सर्व विचारमंथनात उपयोग व्हावा ही अपेक्षा आहे! दिशा हे विचारप्रवर्तक मासिक गेली १८ वर्ष आम्ही चालवत आहोत.

संमेलनास माझ्या व विद्या प्रसारक मंडळाच्या शुभेच्छा!

**डॉ. विजय वासुदेव बेडेकर**
कार्याध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ

**पं. दीनदयाल यांचे सूत्रवाक्य**

हा लेख मी इथेच संपवणार आहे. पण तो ही पंडीत दीन दयाळ उपाध्याय यांच्या एका वाक्याने ते असे – **"If you deny Spiritualism, then human relations and behaviour and the relationship between man and the universe cannot be explained" (page no. 15, 'Principles and Policies," Document 1 - "Integral Humannism" - Edited by Devendra Swarup, Deen Dayal Research Intitute First Edition 1992 New Delhi)**

**भाषांतर**

**''जर आपण 'अध्यात्म नाकारत असाल, तर मानवी नाती व वर्तणूक आणि मानव व विश्व यामधील नातेसंबंध सांगता येणार नाहीत (समजणार नाहीत, जाणता येणार नाहीत)''**

पुढच्या अंकात ह्या विचार संमेलनात काय झाले त्यावर भाष्य करूया.

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी – २५३६८४५०
मोबाईल – ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

# एक कमालीचा छंदिष्ट माणूस श्रीकृष्ण गोविंद, उर्फ नाना पारनाईक सर

*'नाना' छंद जोपासणारे नाना पारनाईक सर यांच्या छंदांचा हा धावता परिचय आहे. अफाट वाचन, संग्रहावरील प्रेम अशी वैशिष्ट्ये असणारे नाना एका लेखात साठवणे तसे कठीणच - संपादक*

घरा जाता जाता मला शरद मुठेचं एक खूप जुनं बालगीत आठवले -

लाकडाचा काऊ आहे, रबराची माऊ, चिऊ आहे,
मातीचा आऊ आहे, प्लॅस्टिकची चिऊ आहे,
राणी आहे, राजा आहे, पप्पू आणि बाजा आहे,
चेंडू आहे, शिटी आहे, दांडू आणि विटि आहे,
मगरआहे, सुसर आहे, हरिण, वाघ, कुक्कर आहे,
प्राणी आहे, पक्षी आहे, फुलवेलीची नक्षी आहे,
गाडी आहे, घोडा आहे, नवरानवरी जोडा आहे,
शहाँजहाँचा ताज आहे, संसाराचा साज आहे,
आला रे आला, आला आला फेरीवाला....

आमच्या ठाण्याच्या पारनाई सरांचं नाव 'एक छंदिष्ट' माणूस म्हणून ऐकून होतो. पण एका दिवाळी अंकाच्या निमित्ताने प्रत्यक्ष भेटीचा योग आला.



**श्रीकृष्ण गोविंद, उर्फ नाना पारनाईक सर**

मो. ह. विद्यालयातून उपमुख्याध्यापक म्हणून निवृत्त झालेल्या पारनाईक सरांच्या त्यांच्या घरी गेलो. सर्वसामान्य मध्यमवर्गीय गृहस्थाचं असावं तसं त्यांचं साधसुधं घर, म्हणजे एक 'मिनी-म्युझियमच' आहे. वयाची पंचाहत्तरी उलटून गेलेल्या नानांची स्मृती एकदम तल्लख आहे. ते त्यांच्या छंदांविषयी सांगायला लागले की आपल्याला ऐकतानाही दम लागतो. आणि त्यांचं वस्तुसंग्रहालय पहायचं म्हटलं तर आख्खा एक दिवस पुरणार नाही. नानांच्या अनेकविध छंदाविषयी या लहानशा लेखात लिहिणं केवळ अशक्य आहे, तरीही प्रयत्न करतो. घरी गेल्यावर त्यांना मी थेट प्रश्न विचारला-

**मी** : नाना, तुमच्या छंदाविषयी ... (सुधीर गाडगीळांची प्रश्न असाच सोडून देण्याची स्टाईल आहे!)

**नाना** : विचारा. विचारा पण ऐकताना कंटाळणार तर नाही ना? आणि मला सांगा, वेळ किती आहे?

**मी** : नाना, तुम्ही सरळ सांगायला सुरुवात करा, वेळेचं काय, तुम्हांला त्रास होणार नाही, असं पहा. (नंतर 'एडिट' होईलच..मी मनातल्या मनात नेहमीप्रमाणे!)

**नाना** : त्रास वगैरे काही नाही माझी प्रकृती या वयातही उत्तम आहे, आणि छंदांविषयी मी सांगायला लागलो की मला एक वेगळीच शक्ती येते...स्मृतीला पुन्हा धार लागते. तुम्हांला किती ऐकायचंय ते सांगा.

**मी** : नाना सांगा, तुमचा सर्वांत पहिला छंद कोणता? ( जनरल प्रश्न)

**नाना** : स्वाक्षऱ्या गोळा करण्याचा...(तो असतोच म्हणा लहानपणी!)

**मी** : तो कसा आणि कधी सुरू झाला? सर्वांत पहिली स्वाक्षरी कोणाची घेतली?

**नाना**: अहो, मालेगावाला आमच्या घरी सरसंघचालक गोळवलकर गुरुजी आलेले आहेत, एवढंच नव्हे, तर प्रत्यक्ष सावरकरही आले होते तेव्हा माझं वय दहा-अकरा होते, तेव्हा मी गुरुजी आणि सावरकरांच्या सह्या घेतल्या आणि तेव्हापासून 'स्वाक्षऱ्या' घेण्याचा छंदच मला लागला.

**मी** : आजपर्यंत किती घेतल्या आहांत सह्या? एखादं

विशेष व्यक्तिमत्त्व? ( मी सुधीर गाडगीळांसारखे कमीत कमी शब्दात प्रश्न विचारत होतो!)

**नाना** : कुणाकुणाची नावं घेऊ, असे कोणतंही क्षेत्र नाही की ज्या क्षेत्रांतल्या मोठमोठ्या माणसांची स्वाक्षरी माझ्याकडे नाही... माझ्याकडे जवळजवळ १५०० वर सह्या आहेत, पैकी भारताच्या पाच पंतप्रधानांच्या ( नेहरू, शास्त्री, इंदिराजी, मोरारजी आणि अटलजी) सह्या आहेत...बोला!

**मी** : नाना, मी यावर काय बोलणार, एकदा सावकाशीने येईन.

**नाना** : माझा वस्तुसंग्रह व्यवस्थित फुरसदीने पहायचा तर तुम्हांला माझ्याकडे एक दोन दिवस रहायलाच यावं लागेल.

**मी** : स्वाक्षरीचा छंद झाला. दुसरा?

**नाना** : स्टॅम्पस्‌चा छंद.

**मी** : किती आहेत? स्टॅम्प्स्‌?

**नाना** : तुमचा अंदाज?

**मी** : असतील चार-पाचशे ..( मी भीत भीतच तसा वाढवूनच आकडा सांगितला)

**नाना** : (दिलखुलास हसत) ... बहात्तर हजार, बहात्तर हजार...

**मी** : नाना, साष्टांग नमस्कार. स्टॅम्प्स्‌विषयी विशेष काही.

**नाना** : बहात्तर हजार स्टॅम्प्स पैकी एक हजारच्यावर नुसती first day' Covers आहेत.

**मी** : आणखी काही ...

**नाना** : अहो, काय काय सांगू? माझा नाण्यांचा संग्रहही नामांकित आहे.

**मी** : काही खास नाणी? दुर्मिळ?

**नाना** : मोगलाई, शिवकालीन, पेशवाई, ब्रिटिशांची नाणी... विशेष सांगण्यासारखं म्हणजे संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, शिवाजी महाराजांपासून ते अगदी भगतसिंग, सुभाषचंद्र बोस, राजीव गांधींच्या स्मरणार्थ काढण्यात आलेली नाणी माझ्याकडे आहेत. त्यापैकी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सर्वांत जास्त किंमत सुभाषचंद्र बोस यांच्या Commomorative Coin ला आहे, आणि त्याला जास्त मागणी जर्मनी, जपान, चीन, ब्रह्मदेश इथे आहे. या नाण्यासाठी दहा हजार रुपये मोजायला काही वस्तुसंग्राहक तयार आहेत. इतरही नाण्यांना कमी जास्त किंमत आहे. पण कोणत्याही परिस्थितीत मी ती विकणार नाही. माझ्या भावना त्यांच्याशी निगडित आहेत.

**मी** : नाणे संग्रहाविषयी एखादी विशेष आठवण.

**नाना** : आहे, आहे. मद्रासला झालेल्या विश्वचषकाच्या सामन्याच्यावेळी टॉससाठी माझ्या संग्रहातला १९२२ सालचा चांदीचा रुपया वापरला होता. त्या नाण्याची आताची किंमत रु. ८०००/- आहे. पण कितीही किंमत आली तरी मी तो विकणार नाही.

**मी** : बाप रे! इतर? छंद... किंवा ...

**नाना** : सुमारे ८०० नोटा आहेत. पैकी विशेष म्हणजे Frank Warrel चा शिक्का असलेली १९५० च्या सुमारासची West India ने मिनिदाद येथे प्रकाशित केलेली नोट माझ्या संग्रही आहे. अशा अनेक.

**मी** : आणखी?

**नाना** : तुम्ही कंटाळलात का? नसाल तर सांगतो. माझ्याकडे सुमारे ८५० छोटी छोटी कार मॉडेल्स आहेत. लोकप्रभाची गेल्या ४० वर्षांची मुखपृष्ठ आहेत. दलाल आणि मुळगांवकरांची चित्रं आहेत. गेल्या ५०-६० वर्षातली बाळासाहेब ठाकरेंपासून ते अगदी विकास सबनीसपर्यंत हजारो व्यंगचित्रे आहेत.

**मी** : काय म्हणताय काय, नाना?

**नाना** : ऐकताय ना?... सुमारे १००० हून जास्त

आगपेट्या, १०० हून जास्त सिगरेट पाकिटे, खेळायचे पत्ते, क्रिकेटवरची तसेच संगीतावरची कैक पुस्तके, सुविचार संग्रह, शेकडो छोट्या छोट्या काचेच्या रंगीत बाटल्या, ४०० च्या वर बॉलपेन्स.

**मी** : (नुसतंच) अरे बापरे! (नाना छंद आहेत म्हणून सरांना 'नाना' म्हणतात की काय?)

**नाना** : एवढ्याने काय होणार? ऐका-३००च्या वर की चेन्स आहेत. ग्रीटिंग कार्डस, निमंत्रण पत्रिका...गणपतीचे शेकडो फोटो. बरंच काय काय आहे. एकदा वेळ काढून या हो पहायला. मी संगीताच्या तालावर एकाच वेळी दोन हातांनी चित्र काढतो. मी भरतकाम करतो. रांगोळ्या काढतो, कथाकथनाचे कार्यक्रम करतो, फोटोग्राफी करतो, विनोदी किस्से सांगण्याचा कार्यक्रम करतो, माझी पत्र मैत्री अचाट आहे.

**मी** : अहो, नाना हे ऐकतांना मला दम लागला. आता, जाता जाता मला फक्त एकच खास छंद सांगा-

**नाना** : (किंचित गंभीर होत) छंद म्हणता येणार नाही. पण माझ्याकडे एक महादुर्मिळ वस्तू आहे. कदाचित जगात ती एकच असण्याची शक्यता आहे. सांगू? ही वस्तू मी मिळवली नाही, तर मला आपोआप मिळाली.

**मी** : सांगा, सांगा.

**नाना** : १९३६ साली बर्लिनमध्ये झालेल्या ऑलिंपिक्सच्या निमित्ताने 'सुवेनियर' म्हणून काढलेला, ४८ देशांच्या ध्वजांची चित्रं असलेला २० सेमी x २० सेमी. आकाराचा प्युअर सिल्कचा रेशमी रूमाल आहे. (या ४८ देशांत अर्थातच भारत नव्हता.)

**मी** : हा कुठे मिळाला तुम्हाला?

**नाना** : सांगतो, त्याची एक कथा आहे. थोडक्यात सांगतो, दुसऱ्या महायुद्धांत जर्मनीची हार झाल्यानंतर दोस्त राष्ट्रांनी हिटलरसंबंधी एकही वस्तू दिसता कामा नये असा फतवा काढला. लहान सहान बटणांपासून, चिन्हांपासून सर्व वस्तू भीतीपोटी नष्ट करण्यात आल्या. तेव्हा एका जर्मनाने हा रूमाल एका फोटोफ्रेमच्या मागे जवळजवळ ५० वर्ष दडवून ठेवला होता. त्याने वयाची ८० ओलांडल्या नंतर माझ्याविषयी माहिती असल्याने, बार्लिनमध्ये असलेल्या माझ्या डॉक्टर असलेल्या भावाला दिला. त्याने तो मला दिला. मी तो जपून ठेवला आहे. या कधीतरी पहायला.

**मी** : साष्टांग नमस्कार घालतो. आणि निघतो. तुमचा एखादा फोटो?

**नाना** : घेऊन जा, पण काम झाल्यावर आठवणीने परत आणून द्या.

**मी** : नक्की नाना. नमस्कार! येतो एकदा सवडीने तुमचं हे वस्तुसंग्रहालय पहायला!

**नाना** : अवश्य या. नमस्कार. लेख आला की कळवा.

**श्री. सुभाष जोशी**

अे/५०४, काशीधाम सी.,
जयहिंद पार्क,पारसिक नगर,
कळवा, ठाणे ( प.)- ४०० ६०५
भ्रमणध्वनी : ९८९२१३८२२०
Email : subhashjoshi.1948@gmail.com
sugojoshi@rediffmail.com

●●●

**दिशा संपर्क दूरध्वनी**
**०२२-२५४२ ६२७०**

साहित्य जगत

# महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र
# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

महाराष्ट्र साहित्य पत्रिका (महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे-४११०३०,दूरभाषः०२०-२४४७५९६३) या म.सा.प.च्या त्रैमासिक मुखपत्रास १२.८.२०१२ रोजी शंभर वर्षे पूर्ण झाली आहेत. ऑगस्ट २०१३ ला १०१ वा अंक महोत्सवी स्वरूपात प्रसिद्ध होणार आहे.

**संग्राह्य अंक**

महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या (अंक क्र. ३४२, ऑक्टो. ते डिसेंबर २०१२) या अंकात संपादकीयामध्ये या पत्रिकेच्या १०० वर्षांच्या इतिहासाची महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे. ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. नागनाथ कोत्तपाल्ले यांचा विस्तृत परिचय या अंकात दिलेला आहे.

मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक 'दर्पण'कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची द्विजन्मशताब्दी २० फेब्रु. २०१२ पासून सुरू होत आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाच्या इतिहासात त्यांचा 'महाराष्ट्राचे सामाजिक सुधारक' असा उल्लेख केला जातो. त्यांच्या चरित्र कार्याचा संक्षिप्त आढावा पत्रकार रवीन्द्र बेडकिहाळ ( महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधी, फलटण, जि. सातारा, मोबाईल नं. ९४२२४००३२१) यांनी 'पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर' या लेखात घेतलेला आहे. ( श्री. बेडकिहाळ यांनी 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर : जीवन आणि कार्य' हे विस्तृत चरित्र यापूर्वी लिहिले आहे व त्यांची दुसरी आवृत्ती लवकरच प्रसिद्ध होत आहे. प्रत्येक मराठी माणसाने या महाराष्ट्र भूषण पदवी लाभलेल्या असामान्य कर्तृत्वाच्या बुद्धिमंताचे चरित्र वाचलेच पाहिजे. डॉ. सुहास पुजारी, डॉ. सौ. शोभा घोलप इ. चे माहितीपूर्ण लेख या अंकात असल्यामुळे अंक संग्राह्य झालेला आहे. त्याबद्दल या त्रैमासिकाचे संपादक डॉ. सु. प्र. कुलकर्णी व अंकातील सर्व लेखक यांचे मनःपूर्वक अभिनंदन, संपादक मंडळात डॉ. कल्याणी दिवेकर, नंदा सुर्वे, डॉ. किसन पाटील, श्याम जोशी, महेंद्र गंजाळ (निर्मिती सहाय्यक) आणि प्रकाश पायगुडे (जाहिरात समन्वयक) हे आहेत. वाचन-संस्कृती वृद्धिंगत करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. यासाठी या पत्रिकेचे सभासदत्व स्वीकारणे हे उत्तम, धन्यवाद.

**महाराष्ट्र साहित्य परिषदेची महत्वाची प्रकाशने**

<u>मराठी वाङमयाचा इतिहास</u> (खंड १ ते ७ एकूण किंमत रु. ७०००/- (शाळा, महाविद्यालये आणि व्यक्तिगत ग्राहकांना सवलतीचे मूल्य रु. ५२५०/-).

<u>भाषा व साहित्य</u> : संशोधन-संपादक डॉ. वसंत स. जोशी

मराठी भाषेचा संशोधक-विद्यार्थ्यांना भाषा आणि साहित्यातील संशोधनाची दिशा आणि पद्धती सांगणारा ग्रंथ म.सा.प. ने पुनर्मुद्रित केला आहे. यात मराठीतील तीस अधिकारी व्यक्तींचे विविध विषयांवरील अभ्यासू लेख संपादित केलेले आहेत. प्रथम आवृत्ती १९८१ भाग पहिला. सुधारित आवृत्ती २००६ मध्ये प्रसिद्ध झाली. पृ.४५० (डेमी) मूल्य रू. ५००/-, भाग २ रा मूल्य ३००/- भाग ३ रा मूल्या रु. २००/-. महाराष्ट्र साहित्य पत्रिका सूची (१९१३ ते २००४) सूचीकार डॉ. मीरा धांडगे पृ.(रॉयल) २५६+४ रु.४००/-; सवलतीत ३००/-रू.

संपादक प्रा. रा. ग. जाधव (प्रमुख संपादक), डॉ. विभा देशपांडे (कार्यकारी संपादक).

मराठी भाषेच्या अभ्यासकांनी, संशोधकांनी आणि महाराष्ट्रातल्या विविध ग्रंथालयांनी हे ग्रंथ आपल्या संग्रही अवश्य ठेवावेत.

**ललित-सुवर्ण महोत्सवी वर्ष २०१३**
**(जाने.२०१३ ते डिसेंबर २०१३)**

ग्रंथप्रेमी मंडळाच्या सहाकार्याने ग्रंथलेखन, ग्रंथप्रसार आणि ग्रंथसंग्रह या विषयांना वाहिलेले श्रेष्ठ दर्जाचे मासिक कै. केशवराव कोठावळे यांनी १९६४ साली सुरु केले. त्यास डिसेंबर २०१२ अखेर ४९ वर्षे पूर्ण झाली आहेत. आता जाने.२०१३ मध्ये मासिकाने ५० व्या वर्षात पदार्पण केलेले आहे. त्याबद्दल संपादक अशोक कोठावळे व त्यांचे सहकारी आणि मासिकास लेखन सहकार्य करणारी सर्व लेखक मंडळी यांचे मनःपूर्वक अभिनंदन (मासिकाचा कार्यालयीन पत्ता - ३०८, फिनिक्स, ४५७ एस. व्ही. पी. रोड, गिरगाव, मुंबई - ४००००४, दूरध्वनी-०२२/२३८२६२२५, वा.व. २८०/- रुपये, चार वर्षाची सवलतीची वर्गणी रु. १०००/- वर्गणीचा धनादेश/डी.डी./मनीऑर्डर 'ललित मासिक' या नावाने काढावा. बाहेरगावचा धनादेश असल्यास ६० रुपये वटणावळ पाठवावी).

सुवर्ण महोत्सवी वर्ष (जाने.२०१३ ते डिसेंबर २०१३)

या सुवर्ण महोत्सवी वर्षात कायमचे संग्राह्य ठरतील व अभ्यासकास दिशादर्शक होतील असे दहा विशेषांक व एक दिवाळी अंक असे अकरा अंक प्रकाशित होणार आहेत. अंकाचे विषय आणि अतिथी संपादक पुढीलप्रमाणे आहेत.

'वाचन संस्कृती' (संजय भास्कर जोशी), 'कविता' (वसंत पाटणकर), 'ललित गद्य' (प्रा. वि. शं. चौघुले), 'समीक्षा' (विलास खोले), 'वाङमयीन नियतकालिके' (सतीश काळसेकर), 'चरित्रे-आत्मचरित्रे (मीना वैशंपायन), 'कथा' (पुष्पलता राजापुरे -तापस), 'दृश्यकला' (वसंत सावटे/दीपक घारे), 'नाटक' (अनंत देशमुख), 'कादंबरी' (नागनाथ कोत्तापल्ले) आणि नेहमीप्रमाणे दर्जेदार दिवाळी अंक. वाचकांना विनंती की जे अजून वर्गणीदार झाले नसतील त्यांनी ताबडतोब वर्गणीदार व्हावे आणि वाचनीय व अभ्यासनीय अंकांचा लाभ घ्यावा. ५ वर्गणीदारांची ४ वर्षांची वर्गणी मिळवून दिल्यास ५००/- रु.ची 'मॅजेस्टिक'ची भेट पुस्तके घरपोच मिळतील.

**ललित सुवर्ण महोत्सव समिती**

हे सर्व आयोजित करण्यासाठी ललित सुवर्ण महोत्सव समिती आयोजित करण्यात आली आहे ती अशी.

अध्यक्ष-मधु मंगेश कर्णिक, कार्याध्यक्ष-वसंत सरवटे सदस्य - विलास खोले, मीना वैशंपायन, अनंत देशमुख, संजय भास्कर जोशी, सचिव-शुभांगी पांगे, निमंत्रक-अशोक केशव कोठावळे.

**विशेष खंडांचे प्रकाशन**

गेल्या पन्नास वर्षातील एकंदर मराठी साहित्याचे पर्यालोचन करणारे प्रत्येकी किमान पाचशे पृष्ठांचे दोन खंड प्रसिद्ध केले जाणार आहेत. या दोन खंडांत मराठी साहित्यांतील सर्व शाखांमध्ये प्रसिद्ध झालेल्या सर्व साहित्याचा परामर्श घेणाऱ्या व्यासंगी अभ्यासकांचे दर्जेदार लेखन प्रकाशित होणार आहेत. या दोन खंडांचे संपादन करीत आहेत विलास खोले आणि मीना वैशंपायन.

सर्व ग्रंथालये, वाचनालये, साहित्यिक संस्था व वाचक यांना नम्र विनंती की त्यांनी 'ललित' चे वर्गणीदार व्हावे व हा ज्ञान खजिना आपल्या संग्रही बाळगावा.

**'आपले जग' - एक दर्जेदार साप्ताहिक**

'आपले जग' (कार्यकारी संपादक-वसंतराव आपटे, वाल्मिकी, किर्लोस्करवाडी, जि. सांगली-४१६३०८-२, दूरध्वनी -०२३४६-२२२०५८/२२३५५८) या छोटेखानी पण दर्जेदार साप्ताहिकाचा प्रथमांक १२.२.१९७९ रोजी निघाला. आता येत्या फेब्रुवारी २०१३ मध्ये ते ३५ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्यानिमित्ताने प्रकाशित होणाऱ्या अंकासाठी योग्य असा मजकूर अवश्य

पाठवावा. कोणत्याही क्षेत्रातील प्रचलित विषयांवर सत्य भाष्य आणि भविष्याचा वेध घेऊ शकणारे विचार प्रकटन यास प्राधान्य असावे. शब्द मर्यादा वा विषयाचं बंधन नाही. तथापि स्वीकृती किंवा संपादकीय कात्रीस मोकळीक असावी असे व्यवस्थापकाने ताज्या अंकात जाहीर केले आहे. 'आपले जग' चे मनापूर्वक अभिनंदन.

**ओम् भवति भिक्षांदेही**

या अंकासाठी जाहिरात/देणगी/स्वेच्छानिधी/मूल्य अशा कोणत्याही स्वरूपात आर्थिक सहाय्य करावे असे संपादकाने आवाहन केले आहे. वरील पत्त्यावर ही देणगी पाठवावी.

**'आपले जग' चा डॉ. श्रीधर शंकर फडके अमृत महोत्सव विशेष पुरवणी अंक अल्पपरिचय**

डॉ. श्रीधर शंकर फडके ('किनारा', बोडी, १०८६ बी, कारमेल सेवा मंदिर रस्ता, मडगाव, गोवा, फोन : ०८३२-२७३२६७९, मो. ९८९०२८८९४७) हे गोव्यातील बहुआयामी व्यक्तिमत्त्व १.५.१९३९ रोजी शिरोड (ता. फोंडा) येथे त्यांचा जन्म झाला. वडील शंकर नारायण हे काव्यतीर्थ होते. त्यांचा व्यवसाय पारंपरिक भिक्षुकी आणि कीर्तन. १९५१ ते १९५३ या कालावधीत एक नातेवाईक वेदमूर्ती रामकृष्ण हरी फडके यांचेकडे सिद्धांत कौमुदीचे अध्ययन. पुढील शिक्षण पुण्यात. १९६४ मध्ये पुणे विद्यापीठाची एम. ए. परीक्षा उत्तीर्ण त्याच वर्षी गोवा येथील चौघुले महाविद्यालयात संस्कृत प्राध्यापक पदावर व त्यानंतर एम.ए. समाजशास्त्र ही आणखी एक पदवी. पुढे १९८६ रोजी चौघुले महाविद्यालयाच्या कोकणी विभागाचे प्रमुख. त्यांचे देशी /परदेशी पर्यटन झालेला आहे. पुढे अगदी कालपर्यंत विद्याव्रत व सामाजिक बांधिलकी स्वीकारली. त्यांनी अनेक संस्था स्थापन केल्या. 'परशुराम सेवा केंद्र, 'परशुराम गिरिजन शाळा, परशुराम समाज विज्ञान केंद्र, परशुराम सेवा प्रतिष्ठान आणि अग्रवाल (समाज) संस्कृत पाठशाला ही काही प्रमुख नावे. आकाशवाणीवर मणिमेखला हा संस्कृत कार्यक्रम सादर करीत. संस्कृतमध्ये भाषणेही करीत. त्यांच्या या विविध क्षेत्रांतील कार्याबद्दल त्यांना अनेक पारितोषिके मिळाली. २०.१२.१२ रोजी अमृतवर्षानिमित्त त्यांचा भव्य अमृत महोत्सवी समारंभ साजरा झाला.

**संग्राह्य पुरवणी अंक**

या अंकात अनेक मान्यवरांचे सुंदर लेख आहेत. प्रत्येक लेखातून डॉ. श्री. शंकर स्तुती सुमने उधळलेली आहेत. शेवटी माझ्या शब्दात मी हे त्यांचे अप्रतिम मनोगत दिलेले आहे. या मनोगताच्या शीर्षस्थानी गदिमांची एक विचार प्रवर्तक ओळ दिली आहे ती अशी- लुटून नेसी काय काळा, सौख्य माझे मागले भोगले ते भोगले. त्यांत कविवर्य बाकी बाबू बोरकरांची एक नितांत सुंदर कविता उद्धृत केली आहे ती अशी- ' पिलास फुटूनि पंख, तयांची घरटी झाली कुठेकुठे, आता अपुली कांचनसंध्या, मेघडंबरी सोन पुढे।

**ज्योत्स्ना प्रकाशनाची मुलांसाठी असलेली पुस्तके**

ज्योत्स्ना प्रकाशनाची (मिलिंद ल. परांजपे, धवलगिरी ४३०-३१, शनिवार पेठ, पुणे-४११०३०, मुंबई ऑफिस- मोहन बिल्डिंग १६२, ज. शंकर शेठ मार्ग, गिरगाव, मुंबई-४००००४) मुलांसाठी असलेली काही सुंदर पुस्तके अशी -

**बागडणारी गाणी** :(सचित्र पृ १६, मूल्य रु.१५/-) आवृत्ती पहिली एप्रिल २००५, पुनर्मुद्रण २००९, कल्याण इनामदार.

**चिमण गीते** : (सचित्र पृ २४, मूल्य रु.१२/- नवीन आवृत्ती जून १०) राम गायकवाड.

**बोबडगीते** : (सचित्र पृ २२, मूल्य रु.१२/- नवीन आवृत्ती जून २०११) सौ. उषा खाडिलकर

<u>आपले सोबती</u> – शांता शेळके, फुलपंखी गाणी– कल्याण इनामदार , <u>रंगीत फुगे</u>– राजा मंगलवेढेकर, <u>गंमत झाली भारी</u> – संगीता बर्वे, <u>गाणारे गाल</u>–कल्याण इनामदार, चिवचिव गाव, <u>विचचिव गाणी</u>– कमला पवार, <u>धमाल गाणी</u> – कल्याण इनामदार, <u>चाफा</u> – कुसुमाग्रज, <u>लपाछपी</u>–शांता शेवळे, <u>वाऱ्याचा रंग</u>–शांता शेळके

**भेळ** – अग्रलेखांचे बादशहा–नीळकंठ खाडिलकर यांचे ३५ वे पुस्तक (पुस्तकाची पृ८०, मूल्य रु.५०/–, प्र.आ.२०१२, प्र.आवृत्ती ऑक्टो.२०१२) प्रकाशक नीळकंठ खाडिलकर, नवाकाळ, १३ नवाकाळ पथ, खाडिलकर मार्ग, गिरगाव, मुंबई –४००००४. या पुस्तकात २१ लेख व 'श्रीकृष्ण' ही कविता आहे. 'आई', 'बॅ. नाथ पै', 'सुशीलकुमार शिंदे', 'सुपरफास्ट बॅ. अंतुले' इ. २१ लेख आहेत. ते सारे वाचनीय आहेत. खाडिलकरांची स्मरणशक्ती अचाट आहे. कॉ. श्रीपाद अमृत डांगे त्यांना टेपरेकॉर्ड म्हणत. नेत्यांच्या भाषणांचे किंवा मुलाखतींचे वृतांन्त जसेच्या तसे देण्यात त्यांचा हातखंडा आहे. आज वयाच्या ७९ व्या वर्षीही त्यांची स्मरणशक्ती जबरदस्त आहे. आयडिअल बुक डेपोचे मंदार नेरूरकर म्हणतात, 'मराठी पुस्तके खपत नाहीत असे कोण म्हणतो? भरपूर खपतात. फक्त लेखक नीळकंठ खाडिलकर हवेत. त्यांच्या 'राजा शिवाजी' या पुस्तकाने विक्रम केला. त्याचा तीन लाख खप झाला, अजूनही चालू आहेच. वयाच्या सत्तरीनंतर त्यांनी 'नियती' हे पुस्तक लिहिले. सर्व तरुणांना नीळभाऊंची खास विनंती आहे कीं त्यांनी ते अवश्य वाचावे. शिरीष ताई पै म्हणतात. आज पपा असते तर म्हणाले असते की दहा हजार वर्षात असे पुस्तक झाले नाही! प्रत्येक मराठी माणसाने हे पुस्तक वाचलेच पाहिजे.

**नीळकंठ खाडिलकरांची ग्रंथसंपदा**

त्यांच्या पुस्तकांपैकी महात्मा गांधी, राजे शिवाजी, श्रीकृष्ण, रामायण, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, मराठी, सत्यमेव जयते, नियती पुस्तके उत्कृष्ट आहेत. भारतीय संस्कृतीचा झेंडा डोलत ठेवण्यात ते अग्रेसर आहेत. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व त्यांना दिशा तर्फे शुभेच्छा!

**कर्दळीवन– एक अनुभूती– संग्राह्य ग्रंथ**

(श्री दत्तात्रयांचे गुप्तस्थान– श्री स्वामी समर्थांचे प्रकट स्थान)

प्रत्येक दत्त भक्ताच्या, प्रत्येक स्वामी भक्ताच्या घरी असावा असा हा एक अपूर्व ग्रंथ आहे. ग्रंथाचे लेखक आहेत प्रा. क्षितिज रमेश पाटुकले. प्रकाशक आहेत कर्दळीवन सेवा संघ, ६२२, 'जानकी–रघुनाथ', 'पुलाची वाडी', 'Z' ब्रिजजवळ, कोहिनूर इन्स्टिट्यूट नजीक, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११००४.

रहस्यमय, गूढ, गहन इ. शब्द कमी पडतील अशा प्रकारचा प्रदेश व वातावरण असलेल्या या स्थानाचा परिचय या ग्रंथात करुन दिलेला आहे. त्या त्या महान स्थानांची छायाचित्रे व श्रीदत्तगुरु व त्यांच्या अवतारांची पारंपरिक चित्रे यांनी या ग्रंथाचे श्रद्धामूल्य वाढलेले आहे. श्री महावतार बाबाजी इ. ची छायाचित्रे त्यांत आहेतच.

**ज्येष्ठ पत्रकार व लेखक विजय कुवळेकर यांची प्रस्तावना**

श्री. विजय कुवळेकर आपल्या प्रस्तावनेस म्हणतात, ' कर्दळीवन' या स्थानाला दत्तसंप्रदायात विशेष महत्त्वाचे स्थान आहे. अन्य तीर्थक्षेत्रांप्रमाणे कर्दळीवनाची परिक्रमा सहज किंवा थोड्याशा परिश्रमाने साधणारी नाही. तसेच या स्थानाबद्दल फारशी माहितीही सहजी उपलब्ध नाही. 'कर्दळीवन' हे दत्तगुरुंचे गुप्तस्थान आणि श्रीस्वामी समर्थांचे प्रगट स्थान. श्री श्रीपादवल्लभ आणि श्रीनृसिंहसरस्वती स्वामी यांच्या अवतार कार्यात त्याला विशेष महत्त्व आहे. अक्कलकोट स्वामींच्या दत्तावतारपणाला पुष्टी देते ते आपण कर्दळीवनातून आल्याचे त्यांचे सांगणे, अन्य अनेक ऐतिहासिक, पौराणिक, धार्मिक, अध्यात्मिक संदर्भ या

स्थानाला आहेत. एवढे सर्व असूनही कर्दळीवनात जाणाऱ्यांचे प्रमाण फारच थोडे आहे. दुर्गामाता, सोयी सुविधांचा अभाव, भीती वाटावी असे प्रवाह या साऱ्यांमुळे तेथे जायला फारसे कोणी धजावत नाही. शिवाय, श्रीदत्तगुरुंच्या मनांत असले तरच भाविकांना ही दुर्लभ परिक्रमा घडते, अशीही भाविकांची श्रद्धा आहे.'

**ग्रंथांचे अंतरंग**

१६० पृष्ठांच्या (मूल्य रु.३००/-) या ग्रंथात ९ प्रकारणे व ९ परिशिष्टे ( श्री दत्तप्रभूंचा दिनक्रम्, दत्तसंप्रदायातील फारशी माहिती नसलेली ठिकाणे, दत्तात्रेयांचे १६ अवतार, महावतार बाबाजी, दत्तसंप्रदाय आणि शिर्डीचे साईबाबा, दत्तात्रेयांचे अस्तित्व आणि विज्ञानाच्या मर्यादा, सृष्टीची निर्मिती आणि रचना, कर्दळीवनासंबंधी उपयुक्त माहिती, पत्ते आणि फोन नंबरस्, दुर्मिळ दत्त-मंत्र, यांत्र आणि संदर्भ ग्रंथांची नावे) आहेत.

सुरुवातीच्या ९ प्रकरणांमध्ये १) कर्दळीवन आणि दत्तात्रेयांचे तीन अवतार, २) कर्दळीवनाचा इतिहास ३) कर्दळीवनः भौगोलिक स्थान आणि परिसर ४) कर्दळीवन परिक्रमेचा इतिहास, ५) कर्दळीवन परिक्रमा कशी करावी? ६) कर्दळीवनामहात्म्य आणि महत्त्व ७) अन्नदान, अतिथि सेवा आणि दत्तसंप्रदाय आणि ९) कलियुगातील दत्त अवतारांचे कार्य आणि महत्त्व. विशेष मोलाची माहिती दिलेली आहे. त्यामुळे ग्रंथ परिपूर्ण माहितीची झालेला आहे.

लेखक प्रा. पाटुकले यांनी हा खडतर वाटणारा प्रवास नियोजनपूर्वक आणि मोठ्या चिकाटीने केलेला आहे. श्रीसद्गुरु कृपेनेच ते लाभते असे त्यांचे म्हणणे आहे. एका ओढीने त्यांनी ही परिक्रमा केली आणि कर्दळीवनाबद्दल सर्वांगीण विचार करणारे आणि या पवित्र स्थानाची इत्थंभूत माहिती या ग्रंथात दिली. त्याबद्दल त्यांना धन्यवाद. अशाप्रकारचे मराठीतील हे पहिलेच पुस्तक असावे!

**थोरामोठ्यांचे आशीर्वाद**

प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज महायोग ट्रस्टच्या (मुख्यकेंद्र नाशिक), श्रीरंग नगर, गंगापूर रोड, नाशिक-४२२०१३, फोन नं.०२५३-२३११६१६) पुणे शाखेचे )श्री. वासुदेव निवास, कर्वे रोड, पुणे) ना. य. ढाकणे, या शाखेचे प्रधान विश्वस्त श्री. शारभाऊ जोशी यांचे पुरस्कार या ग्रंथास लाभले आहेत. अध्यात्म शास्त्रातील विख्यात लेखक डॉ. श्रीधर दत्तात्रय देशमुख उपाख्य डॉक्टरकाका यांचे आशीर्वादही या ग्रंथास लाभले आहेत. डॉ. देशमुखांची अनेक पुस्तके आहेत. ती मिळण्याची तीन ठिकाणी अशी- श्रीकृपा प्रकाशन (श्री. गजानन देव) प्लॉट नं.S७, देवालय राणी लक्ष्मीनगर, नागपूर-२२( M-९४२२८३५४०३), सौ. शुभांगी जयंत वनारसे, बी-५ स्टेट बँक नगर, कर्वे नगर, पुणे-५२ आणि सौ. अलका मुतालिक, ३०६ बी, नूतन विशाल अपार्टमेंट, आगरकररोड, डोंबिवली-पू. जि. ठाणे ४२१२०१.

अवघ्या ३ महिन्यांत त्यांच्या दोन आवृत्त्या व ३ पुनर्मुद्रणे प्रसिद्ध व्हावीत यांतच ग्रंथाचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. सर्वप्रकारच्या वाचकांनी, ग्रंथालयांनी हा ग्रंथ आपल्या संग्रही ठेवावा हे उत्तम. लेख प्रा. पाटुकले व प्रकाशक कर्दळीवन सेवा संघ (पुणे); मनःपूर्वक अभिनंदन.

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**

५, अमर कल्पतरू सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर,
डोंबिवली - ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

●●●


जो मनुष्य स्वार्थी असतो तो अघोरी साधना करतो.

पुस्तक परिचय

# ग्रामीण भाषेतील लक्षवेधी शब्दकला

साहित्यकृतीमध्ये अमूक एक साहित्यकृती चांगली किंवा वाईट असे निकष ठरलेले नसतात; तर त्या साहित्य कृतीचं भिडणं न भिडणं हे व्यक्तिसापेक्ष असते. श्री. प्रल्हाद आवळसकर यांच्या ओ. पी. नय्यर वरील एका अप्रतिम पुस्तकामुळे त्यांचा माझ्याशी परिचय झाला व त्यांचे नव्याने आलेले दोन कथासंग्रह त्यांनी मला वाचावयास दिले.

त्यांतील 'निरसन' या कथासंग्रहात केवळ पाच कथा आहेत; पण आवळसकरांच्या खास शैलीमुळे त्या मनात घर करून राहतात. या कथांचे खास लक्षात येणारे वैशिष्ट्य म्हणजे त्यांतील कोकणीचा प्रभाव असणारी शब्दकला. शब्दांची मोडतोड करत अचूक अर्थाने शब्दांचा वापर करणं, नेमके शब्द नेमक्या जागी वापरणं ही त्यांची हातोटी विलक्षण आहे.




भुळभुळत्या नजरेनं एकमेकांकडे पाहणारे चंगू-मंगू (पृ. १५), तिकडे पहावं तिकडे ढासळाढासळ, मोकळपण, मोडकळलेला हातरहाट (पृ. १८), तंबाखूवर पोकळ थाप टाकत..(पृ. २४) ढोपरचाफ्याची फुलं (पृ. ३३) अशा अनेक शब्दाची उदाहरणे नीट अभ्यासली तर आवळसकरांचे निरीक्षण, प्रसंगाच्या संदर्भात त्यांनी शब्दांची मोडतोड करीत केलेला अचूक वापर, अशा शब्दांच्या सांस्कृतिक सामाजिक कक्षा यांचे त्यांना असणारे भान याचा स्वतंत्र अभ्यास करता येण्यासारखा आहे.

या संग्रहात समाविष्ट असणाऱ्या कथा पुढीलप्रमाणे आहेत. १. चंगू-मंगू २. मठाची उठाठेव ३ निरसन ४. पानपुडी व ५. आक्रीत पुस्तकाचे दोन पानी मनोगत अचूक आहे. लेखन करा असा सल्ला अनेकजण देतात. अशा विविध सल्ल्यांची उदाहरणे देत आवळसकर म्हणतात. ''माझी अवस्था मात्र भोवणाऱ्या अडकलेल्या फांदीसारखी झाली आहे''

''माझी अशी समजूत आहे की मुळात एखाद्या विशिष्ट विषयाची नैसर्गिक ओढ प्रत्येक लेखकाला असते'' श्री. आवळसकर यांचे मन अशा छोटेखानी संघर्षातून घडणाऱ्या नाट्याकडे धाव घेते. उमेदवारीच्या काळामध्ये त्यांनी लिहिलेल्या या पाच कथा या सहजपणे घडणाऱ्या व अचानक वेगळे वळण घेणाऱ्याला वेगळी चालना देणाऱ्या आहेत. यथावकाश एक 'शोधवळसा' घेतल्यानंतर त्या घटनांमागील अन्वयार्थ उलगडतो व त्यातून श्री. आवळसकर यांची कथा आकाराला येते. मला व्यक्तिशः काही ठिकाणी त्यांच्या कथेवर चि. त्र्यं. खानोलकर व जी ए. कुलकर्णी यांच्या शैलीचा प्रभाव जाणवतो; पण तो अगदी अस्फुटसा.

या कथांवर कोकणातल्या बोलीचा जसा प्रभाव आहे तशीच या कथांमधील वातावरण निर्मिती परिणामकारक आहे. चंगू-मंगू या कावळ्यांच्या पिलांचं अचानक पिंपावर उगवणं व फटाक्यांच्या आवाजानेच पुन्हा घरट्यात जाणं या घटनाक्रमांत कावळ्याच पिपाभोवतीचं विश्व, त्यातून निर्माण होणारी वातावरणनिर्मिती कथा संपेपर्यंत मनावर प्रभाव करीत राहते. ही वातावरणनिर्मिती हे आवळसकरांच्या प्रमुख वैशिष्ट्यांपैकी एक असते. त्यांचे व्यक्तिचित्रणही असेच मनोवेधक आहे. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वातील हे कंगोरे आवळसकर ठळकपणे रेखाटतात. ज्यामुळे वाचक कथेमध्ये, कथेतील कथानकामध्ये गुंतत जातो.

चांगल्या कथेची म्हणून जी वैशिष्ट सांगता येतील त्यात त्या कथेतील माणसांचे भावविश्व व वातावरण यांच्यातील वादातच यांमुळे कथा प्रभावी होते. हे वैशिष्ट्य निरसन या कथा संग्रहातील कथांमध्ये आढळते. त्यांच्या ग्रामीण भाषेतील शब्दकला, तिचा कोकणी बाज यांचा परामर्श घ्यावयाचा असेल तर वेगळा लेख लिहावा लागेल.

**निरसन** – प्रल्हाद आवळसकर
नाशिक, मोनिका प्रकाशन
पृ. १०४ मूल्य रु. १०५/-

– **ग्रंथप्रेमी**

●●●

# 'फ्युटेक -१३' एका नव्या पर्वाची सुरुवात !

मुंबई विद्यापीठ अंतर्गत शैक्षणिक क्षेत्रात मानाचा ठसा उमटवणाऱ्या ठाण्यातील बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान विभागाने १८-१९ जानेवारी २०१३ रोजी आयोजित केलेला 'फ्युटेक-२०१३' चर्चा सत्राचा कार्यक्रम खरोखरच विविध विषयावरील भविष्यातील नव्या पर्वाची तसेच नव्या संधींची जाणीव करुन देणारा ठरला.

कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन व सादरीकरण यात महाविद्यालय प्रशासनाने विद्यार्थ्यांना आपल्या कौशल्याची ओळख करुन देण्याची जी संधी दिली होती त्याचा त्यांनी उत्तम उपयोग केल्याचे जाणवले. सुरुवातीलाच त्यांनी भविष्यातील एका नव्या सादरीकरणाचा पाया रोवला आहे. उदा. शिक्षण, संशोधन, विज्ञान तथा भविष्यातील तंत्रज्ञान यांवरील आधारित 'फ्युटेक-२०१३' कार्यक्रमाचे निवेदन तथा संचलन करणारी नऊवारीतील ठसठशीत निवेदिका आपल्या फर्राटेदार इंग्रजीतून नेटका संवाद करताना पाहून सर्व उपस्थितांना कौतुक करावे तेवढे कमी वाटले. लवकरच देशातील इतरही शैक्षणिक वा सांस्कृतिक कार्यक्रमात या प्रयोगाची छाप दिसेल यात शंका नाही.. ब्रेव्हो!



**श्री. दिनकर बोर्डे**
शास्त्रज्ञ तथा दूरसंचार अभियंता
माजी तंत्रज्ञान सल्लागार
भारत सरकार

भविष्यातील तंत्रज्ञान एक खूप व्याप्ती असलेला विषय केवळ माहिती तंत्रज्ञानापुरता मर्यादित न राहाता विज्ञानातील विविध विषयांना नव्या दृष्टीने नव्या संकल्पनेसह नव्या जगासाठी वैचारीक पर्वणी ठरणारा होता..

उदा. डीएनए संदर्भातील एका अभ्यासपूर्ण भाषणात जिनोम प्रक्रियेतील एक क्लिष्ट भाग.. जो हा एक जिनोम घ्या.. एका खलबत्यात कुटा.. त्यात हा मसाला टाका.. हा मसाला सध्या भारतात मिळत नाही.. तरी काही हरकत नाही... ईटस ओके!.. या प्रकारातला जरी वाटत असला तरी भारतीय माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला हे सादर करणाऱ्या अभ्यासकांनी एका नव्या सशक्त संगणकीय प्रणाली, खलबत्याची, तसेच त्यासाठी लागणाऱ्या सॉफ्टवेअर, मसाल्याची, निर्मिती करण्याचे निदर्शनास आणून दिले आहे यासाठी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

कला, वाणिज्य, विज्ञान, तंत्रज्ञान, भ्रमणध्वनी, दूरसंचार, उपग्रह दळणवळण यात उच्च आणि अतिसुरक्षित माहिती संकलन, प्रक्रिया, साठवण तसेच प्रसारण हा येणाऱ्या काळाचा पाया आहे. जिनोम प्रक्रिया असो वा कोणतीही व्यापक माहिती स्त्रोताची प्रक्रिया.. संगणक प्रणालीचे नव्या युगातील वारे पाहाता आता समांतर संगणकीय प्रणालीचा शैक्षणिक उपक्रमात वापर तसेच सहभाग होणे गरजेचे झाले आहे.. महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच या देश पातळीवरील कार्यक्रमास उपस्थित असलेल्या सर्वांनीच पुढे येवून नमुने दाखल एका समांतर संगणकीय प्रणालीची उभारणी केल्यास.. ही एक ऐतिहासिक शैक्षणिक क्रांती ठरेल हे निश्चित!

विद्यार्थ्यांसाठी एक खास टीप.. भ्रमणध्वनी क्षेत्रातील उपयोगितेवर आधारित 'ॲप्स' तयार करून आपल्या भ्रमणध्वनीवर वर 'टॅब' वर साक्षात पाहाणे हा एक सुखद अनुभव असतो.. त्यासाठी ज्या त्या तंत्रज्ञानाचे 'एसडीके' नेटवर मोफत उपलब्ध असतात. 'डाउनलोड' आणि संगणकात 'इंन्स्टॉल' करुन 'प्रेझेंटेशन' तयार करण्यासाठी

मनाजोगी प्रक्रिया करुन 'खऱ्या मोबाईल' वर कशी दिसेल हे 'एसडीके' तील 'ब्राउझर' वर 'वेबसाईट' सारखी पाहाता येते.. एकदा 'नीट' वाटली की ती 'फाईल' त्यांच्या निर्दिष्ट मोफत 'सर्व्हर' वर 'अपलोड' केल्यास.. आपल्यालाच काय पण जगात कोणालाही आपल्या मोबाईलवर आपले 'ॲप्स' मोफत 'डाउनलोड' करून पाहाता येतात.. आहे ना खरी मज्जा.. ती ही चकटफू..!

बघा काही विधायक कार्य करता येते का ते? मला मुंबईतील ज्येष्ठ नागरिकांनी भेटून सांगितले की.. 'लोकल'च्या तिकिटासाठी उगाचच रांगेत तिष्ठत रहावे लागते.. 'लोकल'चे तिकिट 'मोबाईल'वरच मिळाले तर 'तिकिट खिडकी'ला जवळपास सर्वांचाच रामराम.. आणि वेळेची ही बचत होईल.. नक्कीच.. हे शक्य आहे आणि सोपे देखील.. या बरोबरच 'मोबाईल इंटरफेसिंग' हा पण एक साधासुधा प्रकार आहे.. एकदा का एक 'रांगोळी' वा 'पोळी' जमली की पुढची 'कलाकुसर' वा 'स्वयंपाक' अगदी झकास होणार हे काही वेगळे सांगायलाच नको!

'फ्युटेक -१३'.. एक अविस्मरणीय अनुभव म्हणून सर्वांनाच लक्षात राहिला.. आयोजन समिती नुसार ही एक सुरुवात आहे.. याला पसायदान नाही.. असे सांकेतिक भाषेत सांगण्यात आले ते योग्यच वाटले. महाविद्यालय प्रशासनाची विश्वासपूर्वक साथ, विद्यार्थ्यांचा उत्साह, त्यांच्या डोळ्यांतील आत्मविश्वास.. सांगून गेलाय की 'फ्युटेक -१४' यापेक्षाही नक्कीच 'जोर'दार.. होय.. तेवढाच 'दम'दार आणि 'दिमाख'दार राहील.. तथास्तु!

'आर्टीफीशियल इंटेलिजन्स २०१०' नंतरच्या आठवणपूर्वक भेटीसाठी महाविद्यालयातील आजी तथा माजी विद्यार्थ्यांनी सदर कार्यक्रमात आवार्जून लावलेली भरगच्च उपस्थिती.. मनाचा ठाव घेवून गेली.. परिस्थितीजन्य वेळे अभावी.. ईच्छा असूनही संवादात कमी पडलो याची मात्र हूरहूर राहून गेली.. त्यासाठी क्षमस्व!

माझे वडील म्हणत होते की विज्ञानात प्रयोगाला आणि जीवनात योगाला महत्त्व असते.. आपण प्रयोगशील आहात.. राहिला भाग योगाचा.. तर खरच मी सांगतो की मलाही आपणात येण्यास आनंद वाटतो..!

'फ्युटेक -१३' या उत्कृष्ट झालेल्या कार्यक्रमासाठी मी महाविद्यालय प्रशासन संचालक, विभाग प्रमुख, व्याख्याते, विद्यार्थी तसेच खानपान सेवा व सुविधा यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो व येणारा 'फ्युटेक -१४' कार्यक्रम नक्कीच धमाकेदार राहील असा विश्वास व्यक्त करत आपली रजा घेतो..!

कळावे,

**दिनकर बोर्डे**

शास्त्रज्ञ तथा दूरसंचार अभियंता

माजी तंत्रज्ञान सल्लागार

भारत सरकार

●●●

## दिशासाठी

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# परिसर वार्ता

**– संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग

- शनिवार दि. ८/१२/२०१२ रोजी लहान व मोठ्या शिशुची पालकसभा घेण्यात आली.
- मुलांमधील आत्मविश्वास व त्यांच्यातील कलागुणांना वाव देण्यासाठी लहान व मोठ्या शिशुच्या स्पर्धा घेण्यात आल्या.
- लहान शिशु – मुलगे– कमरेवर हात ठेऊन उड्या मारणे.
  मुली – सश्याच्या उड्या.
- मोठा शिशु – मुलगे– आकार ओळखून वस्तू आणणे.
  मुली – ठोकळ्यात मेणबत्ती लावणे.
- कला चिल्ड्रेन ॲकॅडमी तर्फे घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत –९ व हस्ताक्षर स्पर्धेत–२ मुलांना सुवर्णपदके व प्रशस्तिपत्रके मिळाली.
- नोव्हेंबर महिना संपत आला की डिसेंबर महिन्याची चातक पक्ष्याप्रमाणे विद्यार्थी व पालक वाट पाहत असतात. ह्या महिन्यातील गुलाबी थंडीत मस्तपैकी हल्ला–गुल्ला करून स्नेहसंमेलनामध्ये फुल–टू–धमाल करायची हाच विचार मुलांच्या मनामध्ये रुजलेला असतो आणि हाच विचार आमच्या विभागातील मुलांनी प्रत्यक्ष आचरणात आणून शुक्रवार दि.२१/१२/२०१२ रोजी स्नेहसंमेलनामध्ये 'सकाळ' ह्या विषयावर नृत्ये सादर केली.
- प्रभाती सूर नभी रंगती, वासुदेव आला, उठी श्रीरामा... अशा गाण्यांवर छोट्या मुलांनी बहारदार कार्यक्रम सादर केला. ह्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणी म्हणून बालकलाकार कु. साक्षी प्रदीप वाघमारे हिला बोलावले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्या प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ सभासद मा. श्री. श्री. वि. करंदीकर हे होते. यशस्वी विद्यार्थ्यांना कु. साक्षी वाघमारे हिच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.
- प्रत्येक आठवड्याला मुलांना रंगांचा परिचय होण्यासाठी पांढरा, हिरवा, पिवळा व काळ्या ह्या रंगांच्या वस्तू मांडून रंगांचा परिचय करुन देण्यात आला.
- बुधवार दि.१६/१/२०१३ रोजी शाळेच्या वेळेत हळदी कुंकू समारंभ झाला. प्रत्येक वर्गात मुलांना संक्रांतीचे महत्त्व सांगून हलव्याचे दागिने दाखवले. पाटावर सुगड ठेऊन त्याची पूजा कशी करतात ते मुलांना प्रात्यक्षिकाद्वारे दाखवण्यात आले. मुलींना काळे कपडे घालून यायला सांगितले. सर्व मुलांना तिळगूळ वाटण्यात आला. अशा तऱ्हेने 'तिळगूळ घ्या गोडगोड बोला' असे सांगून, संक्रांतीचे गाणे म्हणून कार्यक्रमाची सांगता केली.

## सौ. ए. के. जोशी प्राथमिक विभाग

- शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम दि. १८ डिसेंबर रोजी पार पडला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. मंगला बोरकर ह्यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. कु. यश देशपांडे हा इयत्ता ४ थी च्या शिष्यवृत्ती परीक्षेत ठाणे जिल्ह्यात पहिला आला. त्याला बक्षीस देऊन विशेष कौतुक करण्यात आले. इतर शिष्यवृत्तीधारकांचेही बक्षीस देऊन कौतुक करण्यात आले. त्याचप्रमाणे विविध विषयांत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या, तसेच विविध स्पर्धा व परीक्षांच्यात चांगले यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा बक्षिसे देऊन गौरव व कौतुक करण्यात आले.

ज्ञान मिळवण्याचा एकमेव उपाय म्हणजे मनाची एकाग्रता.

- त्यानंतर सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेल्या कलांचे नृत्याद्वारे उत्तम सादरीकरण केले. त्यात देशभक्तिपर नृत्ये, कृष्णाचा खट्याळपणा दाखविणारी नृत्ये भावभक्तीत तल्लीन होणाऱ्या वारकऱ्यांची दिंडी तसेच संस्कृत सर्व भाषांची जननी आहे हे सांगणारे नृत्य व सर्वांना प्रेमाचा व ज्योतीसारख्या तेजाने व प्रकाशाने उजळण्याचा संदेश नृत्याच्या अविष्काराने देण्यात आला.

- शाळेचा वार्षिक क्रीडादिन दिनांक ८ व ९ जानेवारी रोजी उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले क्रीडा कौशल्य प्रकट होण्यासाठी विविध शर्यतींचे आयोजन करण्यात आले होते. लहान गट (१ ली व २ री) ह्या विद्यार्थ्यांच्या धावणे, बटाटा शर्यत, डोक्यावर वही घेऊन चालत जाणे इ. शर्यतीचे शाळेत आयोजन केले होते. तसेच मोठा गट (३ री व ४ थी) ह्या विद्यार्थ्यांच्या शर्यतीचे आयोजन मावळी मंडळाच्या भव्य पटांगणावर करण्यात आले. त्यात लांब उडी धावणे, चेंडू फेक इ. शर्यतींचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी त्यांच्या अंगी असलेले क्रीडा नैपुण्य उत्तम प्रकारे दाखवून प्रथम, द्वितीय, तृतीय अशी प्रशस्ती पत्रके पटकाविली. विद्यार्थ्यांनी शर्यतीत हिरिरीने भाग घेतला होता. अशा प्रकारे क्रिडा-दिन उत्साहात पार पडला.

## सौ. ए. के. जोशी माध्यमिक विभाग

**श्रीमती जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धा**

**छोटा गट :** सोहम सांगलीकर – १ ले पारितोषिक
पूर्वा भिडे – २ रे पारितोषिक
प्रचिती दामले – ३ रे पारितोषिक

**मोठा गट :** आदिती गोखले – १ ले पारितोषिके
रोहन मोहिले – २ रे पारितोषिक
रिया बर्वे – २ रे पारितोषिक
सानिका गोरे – ३ रे पारितोषिक

**निसर्गमेळा आयोजित विविध स्पर्धेचा निकाल**

१) पक्ष्यांची ओळख स्पर्धा : सानिका गोरे आणि शांभवी जोशी यांच्या संघाने द्वितीय स्थान पटकावले.

२) प्राणी मंजूषा स्पर्धा : सानिका गोरे आणि शांभवी जोशी यांच्या संघाने द्वितीय स्थान पटकावले.

३) चित्रकला स्पर्धा : गार्गी कोदे – प्रथम उत्तेजनार्थ
शिवानी पिसाट – द्वितीय उत्तेजनार्थ

संस्कृती कला दर्पण संस्थेतर्फे आयोजित केलेल्या इंग्रजी वत्कृत्व स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले :-

कु. अनिश हरकरे – प्रथम क्रमांक
कु. मैत्रयी भारती – उत्तेजनार्थ

**IMP २०१२ गणित मेगा फायनल परीक्षेचा निकाल**

खालील विद्यार्थ्यांना वरील परीक्षेत खालीलप्रमाणे श्रेणी मिळाली :

| इयत्ता | नाव | राष्ट्रीय क्रमांक |
|---|---|---|
| १) इ. ६ वी | कु. श्रीदिप क्षीरसागर | ३७/४७१९ |
| २) इ. ६ वी | कु. ओंकार वरुडकर | १२२/४७१९ |
| ३) इ. ६ वी | कु. सिद्धि कोल्हे | १७८/४७१९ |
| ४) इ. ६ वी | कु. मिहिर देसाई | २४०/४७१९ |
| ५) इ. ८ वी | कु. तक्ष सत्रा | १९२/४७१९ |

**वार्षिकोत्सव २०१२-२०१३**

१५ डिसेंबर २०१२ रोजी माध्यमिक विभागाचे स्नेहसंमेलन झाले. आमच्या शाळेचे माजी विद्यार्थी श्री. सुकुमार साखरदांडे B.E. (Electrical),M.M.M. व डॉ. माधुरी साखरदांडे M.B.B.S., Gynaecologist and

Obstetrician ह्यांनी अध्यक्षस्थान भूषविले. मॅडम कोल्हटकर यांनी पालकांचे स्वागत करून प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर त्यांनी २०१२-२०१३ च्या वार्षिक अहवालाचे वाचन केले. मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. मा. य. गोखले यांनी कार्यक्रम यशस्वी होवो असे आशीर्वादरूपी भाषण करून कार्यक्रमाला सुरुवात केली. शालेय आणि शिक्षणेतर गोष्टींमध्ये प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. इ. ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

**क्रीडादिन २०१२-२०१३**

या वर्षीचा क्रीडादिन इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी दि. ८ जानेवारी २०१३ रोजी तर इ. ८ वी, ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी दि. ९ जानेवारी २०१३ रोजी मावळी मंडळ येथे आयोजित केला होता. विद्यार्थ्यांसाठी खालील स्पर्धा होत्या.

**इ. ५ वी ते ७ वी**

वैयक्तिक स्पर्धा - ६० मि., १५० मि., ३०० मि. धावणे
स्पर्धा : लांब उडी, थ्रो बॉल
सांघिक स्पर्धा - रिले रेस, लंगडी, डॉज बॉल

**इ. ८ वी व ९ वी**

वैयक्तिक स्पर्धा - ६० मि., ३०० मि. (मुली),
६०० मि. (मुले) धावणे
स्पर्धा : लांब उडी, गोळा फेक
सांघिक स्पर्धा - रिले रेस, लंगडी, डॉज बॉल, फूटबॉल (मुले), हँडबॉल (मुले), बास्केटबॉल (मुले) सर्व विजयी खेळाडूंना प्रमाणपत्रे देण्यात आली.

**आनंदमेळा २०१२-२०१३**

मंगळवार, २२ डिसेंबर २०१२ रोजी शाळेत आनंदमेळ्याचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक वर्गाचे स्टॉल होते.

इ. ५ वी -६ वी : विविध खेळ
इ. ७ वी ते ९ वी : विविध खाद्यपदार्थ

तसेच स्काऊट, गाईड, इंटरॅक्ट क्लबचेही स्टॉल होते. काही पदार्थ विद्यार्थ्यांनी स्वतः केले होते. सर्व विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी आनंदमेळ्याचा आनंद घेतला.

**संस्कृती कला दर्पण आयोजित विविध स्पर्धांचा निकाल**

**निबंध :** गट ७/८ - प्रथम क्रमांक - शांभवी जोशी

**चित्रकला :**
गट ५/६ - द्वितीय क्रमांक - अदित्य घोष
उत्तेजनार्थ : रुतुज बारगोडे, साईराज साळवी
गट ७/८ - द्वितीय क्रमांक- साक्षी वैद्य
उत्तेजनार्थ : चित्रजा वालंज, रिया शर्मा, मलेका ठाणावाला

**हस्ताक्षर :**

गट ५/६- द्वितीय क्रमांक- अक्षता शहा (नगदा)
उत्तेजनार्थ - भूमिका सांवत
गट ७/८ - प्रथम क्रमांक - शांभवी जोशी

**वक्तृत्व :** प्रथम क्रमांक- मैत्रयी भारती

**संस्कृती कला मंच आयोजित विविध स्पर्धेचा निकाल:**

**चित्रकला :**

गट ५/६ - द्वितीय क्रमांक - अक्षता शाह (नगदा)
उत्तेजनार्थ - ज्ञानदा जोशी, सिद्धी कानेटकर, फाल्गुनी गुप्ता, सुचित गुप्ते, केतकी जोशी, इशिता फाटक, आदित्य भावे, पियाली सिंग.
गट ७/८ - द्वितीय क्रमांक- प्रतोष निमकर

**निबंध :**

गट ५/६ - द्वितीय क्रमांक - वैशाली घोटावडेकर
उत्तेजनार्थ - सारंगदिप सचदेव, सिद्धी कानेटकर, तन्वी बापट, जान्हवी पाटील, भूमिका पाध्ये.

गट ७/८ – प्रथम क्रमांक – शांभवी जोशी
उत्तेजनार्थ – अथर्व ताम्हाणे, प्रज्ञा घारपूरे, तनिषा महाजन, पल्लवी पवार, राहुल धवले, ध्रुमी चढवा, निधी भावे.

गट ९/१० – द्वितीय क्रमांक – सानिका मोरजकर
उत्तेजनार्थ – सौमिली साळी, चिन्मई चाचड, आकांक्षा अगरवाल.

**हस्ताक्षर :**

गट ५/६– द्वितीय क्रमांक – चिन्मई राईलकर
उत्तेजनार्थ – ज्ञानदा जोशी, प्रियंका गोस्वामी, धारा सावला, विश्वराज बोरकर, साची सांगाडकर, उर्वशी सोनिगरा, जेनिल शहा, आकाश गोरे, तनुजा महाजन.

गट ७/८ – प्रथम क्रमांक – संयुक्ता मुळे
उत्तेजनार्थ – अदिती भावे, श्रद्धा सल्वी, सेजल देशपांडे, गार्गी कोदे, हर्षील बैवा, पल्लवी पवार, शांभवी जोशी, कश्वी बैवा.

गट ९/१० – उत्तेजनार्थ – जुईली चव्हाण, गायत्री थोंब्रे, जान्हवी पाटणकर, अक्षी छेडा, हिनल विसारिया.

संस्कृती कला दपर्ण आयोजित नाटक स्पर्धेत आमच्या शाळेच्या शिक्षिकांनी 'गर्भितार्थ' हे नाटक सादर केले. नाटकाला प्रथम क्रमांक, उत्कृष्ट दिग्दर्शिका – सौ. प्रियांका भांगले, उत्कृष्ट लेखिका– सौ. हर्षदा बोरकर तसेच सौ. जुई कुलकर्णी ह्यांना उत्कृष्ट अभिनेत्रीचे पारितोषिक मिळाले. ह्याच नाटकाला ३ ऱ्या शिक्षक साहित्य संमेलनात द्वितीय पारितोषिक मिळाले.

**रोटरी क्लब ऑफ ठाणे आयोजित गायन स्पर्धेचा निकाल**

अपूर्वा पुराणिक – महिला एकेरी गायन स्पर्धेत मराठी विभागात प्रथम व हिंदी विभागात द्वितीय पारितोषिक मिळाले.

श्रेयस केळकर – पुरुष एकेरी गायन स्पर्धेत मराठी विभागात प्रथम व हिंदी विभागात द्वितीय पारितोषिक मिळाले.

• शशी जोशी आयोजित नाटक स्पर्धेत आमच्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी 'सूर्यशक्तीचा विजय असो' हे नाटक सादर केले. नाटकाला द्वितीय क्रमांकाचे व प्रेक्षक पसंतीचे तसेच सानिका जोशी हिला उत्कृष्ट अभिनेत्रीचे पारितोषिक मिळाले.

प्रारंभ कला अकादमी आयोजित एकपात्री प्रयोग स्पर्धेत मैत्रयी भारती हिला प्रथम पारितोषिक मिळाले. तसेच महिला स्त्री संघ आयोजित वक्तृत्व स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

**क्रीडा**

**अ) बॅडमिंटन**

१) खालील संघ ठाणे येथील आंतरशालेय स्पर्धेत उपविजेता ठरला – आदिती बाभे, शलाका सहस्त्रबुद्धे, संजना जोशी, वैष्णवी घाग आणि भूमिका पाध्ये.

२) वैष्णवी घाग हिला ठाणे जिल्हास्तरीय स्पर्धेत एक कांस्य पदक पटकावले.

**ब) पोहणे**

१) वैष्णवी देसाई हिने DSO आंतरशालेय स्पर्धेत २०० मि. ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये रजतपदक आणि १०० मि. बेस्ट स्ट्रोकमध्ये कांस्यपदक तसेच राज्सस्तरावर पात्र ठरली. नागपूर येथील राज्सस्तरावर स्पर्धेत २०० मि. ब्रेस्ट स्ट्रोकमध्ये कांस्यपदक पटकावले.

२) जिल्हास्तरीय जनादेश स्टारफिश स्पर्धेत वैशणवी देसाई हिला ५० मि. बेस्ट स्ट्रोकमध्ये प्रथम क्रमांक व सृष्टी नाईक हिला ५० मि. बॅक स्ट्रोक आणि ५० मि. बटरफ्लायमध्ये ३ रा क्रमांक मिळाला.

---

विषय हे इंद्रियाला विषासमान आहेत.

### क) क्रिकेट

१) खालील संघ DSO १४ वर्षाखालील सामन्यात उपविजेता ठरलाः हर्षल वेलिंग, राहुल सूर्यवंशी, मीत राठोड, प्रतिक तारमले, सिद्धेश कर्णिक, चेतन गाडगे, अर्थव बापट, शुभम राठोड, सोहम बंडागळे, हार्दिक सावंत, तन्मय अंबिके, गौरांग मोरे, निशांत फाटक व मोहित तिवारी.

२) खालील संघ जिल्हा स्तरीय SMS १४ वर्षाखालील सामन्यात उपविजेता ठरला. हर्षल वेलिंग ह्याने दोनदा मॅन ऑफ द मॅच ची ट्रॉफी व मॅन ऑफ द सिरीज ची ट्राफी पटकावली. शुभम राठोड याला उत्कृष्ट परफोरमर अवॉर्ड मिळाला.

### ड) रोलर स्केटिंग

शरयू मेहंदळे हिने द्वितीय पावसाळी रोलर स्केटिंग स्पर्धेत दोन कांस्यपदके पटकावली.

### इ) कराटे

सतरा वर्षाखालील १४ वे राज्य कराटे स्पर्धेत :

१) रितेश पवार याने काटा सामन्यात सुवर्णपदक पटकावले व कुमित स्पर्धेत रजत पदक पटकावले.

२) ओंकार कुंभार याने काटा सामन्यात कांस्य पदक पटकावले.

### ई) टेबल टेनिस

खालील मुलींच्या संघाने मुंबई विभाग आंतरशालेय स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावले. सिद्धी संखे, नेहा नवरे व स्वरा शहा.

### उ) स्केटिंग

कनिष्का लाड हिने २ रजत व १ कास्यपदक, नवी मुंबई ठाणे जिल्हा स्केटिंग स्पर्धेत पटकावले तसेच राज्यस्तरावर पात्र ठरली.

### हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा २०१२-२०१३

| इ. | परीक्षेचे नाव | उपस्थित विद्यार्थी | निकाल | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | विशेष प्राविण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
| ५ वी | बालबोधिनी | २१ | ०२ | १८ | ०१ | - |
| ६ वी | प्राथमिक | १२ | ०२ | ०५ | ०५ | - |
| ७ वी | प्रवेशिका | १० | ०१ | ०७ | ०२ | - |
| ८ वी | सुबोध | ०१ | - | ०१ | - | - |
| ९ वी | प्रबोध | ०२ | - | - | - | ०२ |

### सी. के. पी. क्लब आयोजित समूह गायन स्पर्धा

खालील विद्यार्थ्यांनी समूह गायन स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकावला -

स्वराली मराठे, साईली आंगणे, शिवानी निफाडकर, प्रज्ञा घारपुरे, जान्हवी साने, सानिका जोशी, श्रेया मिरगल, राजवी पोलाडिया, कौमुदी पाटणकर, शिवानी पाटणकर, अर्णव गद्रे, मकरंद भालेराव, श्रेयस केळकर आणि अमेय कढे.

कु. रुजुला जोशी हिने नांदेड जिल्हा जिमनॅस्टिक असोसिएशन आयोजित २३ वा राज्य रिदमिकस जिमनॅस्टिक स्पर्धेत पहिले पारितोषिक पटकावले.

### युवा प्रतिष्ठान धर्मवीर आनंद दिघे तर्फे आयोजित केलेल्या प्रश्नमंजूषा स्पर्धेचा निकाल

आपल्या संविधानविषयी जागृत करण्यासाठी शाळेत प्रश्नमंजूषा स्पर्धा घेतली गेली. निकाल खालील प्रमाणे :

| श्रेणी | ५ वी | ६ वी | ७ वी | ८ वी | ९ वी |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम | १) सिमरन पेंढारकर | १) कृपा पंडित | १) श्रीदीप क्षीरसागर | १) अभिषेक मोंडकर<br>२) चित्रजा वाळंज | १) प्रणील जोशी<br>२) सौरभ कुलकर्णी<br>३) राज जोशी |
| द्वितीय | १) मृण्मयी कानिटकर | १) उर्वी गुप्ते | १) सानिका गोरे | १) संजना जोशी | १) अमित मलिये |
| तृतीय | १) अर्थव जांबोटकर | १) वृशाली घोटवडेकर<br>२) इश्वरी पाटील | १) तनिशा महाजन | १) रेणुका भट<br>२) कश्वि गाला<br>३) अर्थव पंडित<br>४) आदिती भाभे | १) निनाद मराठे<br>२) पार्थ पाटणकर |

**महर्षी व्यास विद्या प्रतिष्ठान आयोजित संस्कृत अमरकोश पाठांतर स्पर्धेचा निकाल**

इ. ९ वी : प्रणिल जोशी – प्रथम क्रमांक
अनिकेत बर्वे – द्वितीय क्रमांक
वरुण निमकर – उत्तेजनार्थ

**नवोदया इंग्लिश हायस्कूल आयोजित कथा लेखन स्पर्धेचा निकाल**

इ. ७ वी : सुधर्म करमरकर – तृतीय क्रमांक

**एलिमेंटरी व ईंटरमिजिएट चित्रकला श्रेणी परीक्षा २०१२–२०१३ : निकाल १००%**

| एलिमेंटरी श्रेणी परीक्षा | ईंटरमिजिएट श्रेणी परीक्षा |
|---|---|
| एकूण प्रविष्ठ विद्यार्थी–३७ | एकूण प्रविष्ठ विद्यार्थी–५६ |
| उत्तीर्ण विद्यार्थी–३७ | उत्तीर्ण विद्यार्थी–५६ |
| 'अ' श्रेणी–१६ | 'अ' श्रेणी–१४ |
| 'ब' श्रेणी–०८ | 'ब' श्रेणी–१७ |
| 'क' श्रेणी–१३ | 'क' श्रेणी–२५ |

**जोशी–बेडेकर महाविद्यालय**

आंतरराष्ट्रीय संगोष्टी यशस्वी होण्याकरिता भूगोल विभागाच्या सर्व प्राध्यापकांनी तसेच सर्व विद्यार्थ्यांनी अथक प्रयत्न केले. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी देखील सर्व कर्तव्ये व्यवस्थित पार पाडली. या सर्वांना प्रोत्साहित करण्याची मोलाची कामगिरी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांनी उत्कृष्टपणे पार पाडली.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागी व्यक्तींना पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आले.

**२०११-१२ या शैक्षणिक वर्षाचा 'उत्कृष्ट महाविद्यालय' हा पुरस्कार महाविद्यालयाला प्राप्त झाला. विद्यापीठाकडून दरवर्षी देण्यात येणारा हा पुरस्कार २६ जानेवारी २०१३ रोजी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुन्तला अ. सिंह यांना मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु श्री. राजन वेलुकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. महाविद्यालयाकरिता ही अत्यंत गौरवाची बाब आहे.**

### गन्धर्व – २०१३

१५ आणि १६ जानेवारी रोजी आंतर महाविद्यालयीन गन्धर्व महोत्सवाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. विविध स्पर्धांमध्ये एकूण १०३ महाविद्यालयांचा सहभाग होता. एकूण ३६ स्पर्धांचे आयोजन या महोत्सवात करण्यात आले होते.

या महोत्सवाची सुरुवात ५ जानेवारी पासूनच झाली होती. आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेची अंतिम पूर्व फेरी 'गडकरी रंगायतन' येथे घेण्यात आली होती. एकूण पाच एकांकिका अंतिम फेरीसाठी निवडण्यात आल्या.

विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांच्या देखील विविध स्पर्धांचे आयोजन गन्धर्व महोत्सवा दरम्यान करण्यात आले होते.

(या कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या महोत्सवात विविध सिने व टी.व्ही. कलाकारांना आमंत्रित करण्यात आले होते. 'उंच माझा झोका' मालिकेतील स्वप्ना जोशी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.)

या महोत्सवास प्राचार्या डॉ. शकुन्तला सिंह उपप्राचार्या मोनिका देशपांडे, उपप्राचार्य श्री. सुभाष शिंदे कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या सौ. गौरी तिरमारे यासर्वांचे मोलाचे प्रोत्साहन लाभले.

### विवेकानंद Study Circle

विवेकानंद अभ्यास मंडळा तर्फे ४ जानेवारी २०१३ रोजी प्रसिद्ध मानसशास्त्रतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांचे या विषयावर भाषण आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांना सूर्यनमस्काराचे प्रशिक्षण देण्यात आले व विद्यार्थ्यांच्या गटचर्चेचे देखील आयोजन या अभ्यास मंडळातर्फे करण्यात आले.

### क्रीडाजगत

यावर्षी जोशी बेडेकर महाविद्यालयाने प्रथमच आंतर महाविद्यालयीन क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले होते. प्रथम वर्षीच एकूण १४ महाविद्यालयांनी विविध स्पर्धांमध्ये भाग घेतला होता.

दि. ७ व ८ जानेवारी २०१३ या दरम्यान महाविद्यालयाच्या विविध मैदानांवर कबड्डी, व्हॉलीबॉल, फुटबॉल, बास्केटबॉल या सांघिक स्पर्धा, पुरुष व महिला गटासाठी 'खो–खो' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे धावण्याची स्पर्धा, थाळीफेक, गोळाफेक इत्यादी स्पर्धांचे देखील आयोजन करण्यात आले होते.

ठाणे परिसरातील सुमारे ४० पदवी महाविद्यालयांना निमंत्रित करण्यात आले होते. सुमारे ३०० हून अधिक स्पर्धक यात सहभागी झाले होते. यात ५० महिला स्पर्धकांचा देखील सहभाग होता. स्पर्धेसाठी तज्ज्ञ परीक्षक व मार्गदर्शक प्रशिक्षकांचे सहाय्य घेण्यात आले होते.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली सदर क्रीडा महोत्सव अत्यंत उत्साहात पार पडला. तसेच जिमखाना व क्रीडा समितीच्या प्रमुख प्रा. तेजस्विनी नाडगौडा, क्रीडा मार्गदर्शक प्रा. पी. पी. मोरे यांच्यासह क्रीडा समितीच्या सर्व प्राध्यापकांनी व जिमखाना शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी हा महोत्सव यशस्वी होण्यास परिश्रम घेतले. सदर स्पर्धेचा शेवट डॉ. शकुन्तला सिंह व इतर मान्यवर व्यक्तींच्या उपस्थितीत बक्षिस समारंभाने झाला.

### सांस्कृतिक जगत

मुंबई विद्यापीठाच्या विद्यमान ४५ व्या 'Youth Festival' चे 'Thane Central Zone W' च्या निवड प्रक्रियेचे आयोजन जोशी–बेडेकर विद्यालयात करण्यात आले होते. यात एकूण २७ महाविद्यालयांचा सहभाग होता.

जवळपास ७०० विद्यार्थी कलाकारांचा विविध स्पर्धांमध्ये सहभाग होता. एकूण २४ विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यापैकी २२ स्पर्धांमध्ये महाविद्यालयाने विजय मिळविला.

**महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना यश प्राप्त झालेल्या स्पर्धा**

Fine Art, Cartooning, रांगोळी, Clay Modeling, Collage, वक्तृत्त्व, वादविवाद, संगीत, हिंदी-मराठी नाटक इत्यादी स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रथम पारितोषिक प्राप्त झाले.

On the Spot Painting, नाट्यसंगीत, वादन, समूहगीत, P oster Making इत्यादी स्पर्धांमध्ये द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले.

तसेच हिंदी नाटीका 'जुम्मेबाज' ला द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले.

उत्कृष्ट कलाकार (पुरुष) - अक्षय जाधव
उत्कृष्ट कलाकार (महिला) - तृप्ती गायकवाड यांनी पारितोषिक पटकाविले.

महाविद्यालयाची विद्यार्थी अश्विनी शर्मा हीची मुंबई विद्यापीठातर्फे Zonal आणि National Level करीता संघाचे नेतृत्त्व सांभाळण्यासाठी निवड करण्यात आली. तसेच अश्विनी शर्मा हिची 'राष्ट्रीय रांगोळी स्पर्धेसाठी' देखील विद्यापीठाने निवड केली आहे.

**IPTA Drama Competition**

४१ व्या आंतर महाविद्यालयीन नाटक स्पर्धा IPTA (Indian Peoples Theatre Association) मुंबई येथे हिंदी एकांकिका 'जुम्मेबाज' महाविद्यालयातील कलाकार विद्यार्थ्यांनी सादर केले होते. या एकांकिका स्पर्धेत 'जुम्मेबाज' सर्वोत्कृष्ट एकांकिकेच बक्षिस मिळाले तसेच -

सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन - अमोल भोर
सर्वोत्कृष्ट कलाकार (अभिनेता)- अक्षय जाधव, श्रेयस राणे
सर्वोत्कृष्ट कलाकार (अभिनेत्री) - तृप्ती गायकवाड
उत्तेजनार्थ - कल्पेश समेळ

**Astitva (अस्तित्त्व) एकांकिका स्पर्धा**

कल्पना एक अविष्कार अनेक आधारित 'आम्हास आम्ही पुन्हा पाहणे या संकल्पनेवर आधारित 'कोंडी' या एकांकिकेला महाविद्यालयाच्या कलाकार विद्यार्थ्यांना भरघोस यश मिळाले.

उत्कृष्ट एकांकिका - कोंडी
उत्कृष्ट लेखक - ह्शिकेश कोळी
उत्कृष्ट दिग्दर्शन - अमोल भोर
उत्कृष्ट कलाकार (पुरुष) - श्रेयस राजे
उत्कृष्ट कलाकार (स्त्री) - तृप्ती गायकवाड

**हिंदी विभाग**

२८ जानेवारी २०१३ सोमवार रोजी हिंदी विभागातर्फे वक्तृत्त्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. 'समाज में स्त्रियों को बेहतर सुरक्षा कैसे दी जाय?' या विषयावर स्पर्धा होती. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन एकूण ३७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

१) डॉ. सुशीला गुप्ता, हिन्दुस्तानी प्रचार सभा-मानद शोध निर्देशक

२) डॉ. प्रज्ञा शुक्ला, निवृत्त प्राध्यापिका, नानावटी महाविद्यालय

३) प्रा. प्रतिभा माथुर, जोशी-बेडेकर महाविद्यालय यांसारखी निर्णायक समिती या स्पर्धेला लाभली होती. उपप्राचार्य श्री. सुभाष शिंदे यांचे विद्यार्थ्यांकरीता प्रोत्साहनपर भाषण झाले. तसेच सर्व मान्यवर मंडळींनी आपल्या भाषणाद्वारे प्रोत्साहित केले.

या स्पर्धेत सर्व सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले व पहिल्या तीन विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले.

प्रथम – मधुमती बागची TYFM
द्वितीय – ज्योती दुबे XI[th] COM
तृतीय – कप्तान कुशवाह TYBA

**Student Forum (विद्यार्थी मंच)**

२५ जानेवारी २०१३ रोजी महाविद्यालयाच्या 'विद्यार्थी मंचा'तर्फे महाविद्यालयातील वर्ग तसेच महाविद्यालयाच्या परिसरातील पर्यावरण स्वच्छता याबाबत मोहीम राबविण्यात आली. तसेच प्रजासत्ताक दिनी प्लास्टिक झेंडे न वापरण्याबाबत विद्यार्थ्यांना जागरुक करण्यात आले. या अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कनिष्ठ व पदवी वर्गात जाऊन ही मोहीम राबविली.

२१ जानेवारी २०१३ रोजी 'विद्यार्थी मंचा'तर्फे जोशी-बेडेकर महाविद्यालयातील प्राध्यापिका तन्वी राऊत यांचे 'परिणामकारक संवाद कौशल्य' यावर चर्चात्मक व्याख्यान आयोजित केले होते. विद्यार्थ्यांना त्यांचे उत्तम मार्गदर्शन लाभले.

**भूगोल विभाग**

महाविद्यालयातील भूगोल विभागातर्फे ११ आणि १२ जानेवारी २०१३ रोजी ''आंतरराष्ट्रीय संगोष्ठी''चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. (International conference on "Geography of change" : Contemporary Issues in Environment, Development and Society") या विषयांतर्गत आंर्तराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमासाठी अनेकानेक मान्यवर व्यक्तींचे मार्गदर्शन लाभले.

- डॉ. स्मिता गांधी – भूगोल विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ
- विद्या बाळ – सुप्रसिद्ध समाजसेविका
- उल्का महाजन – सुप्रसिद्ध समाजसेविका
- डॉ. अर्चना गोडबोले – पर्यावरण विषयक कार्यकर्ती
- श्री. अन्टोनी फ्लिन्ट – Urban Planner and fellow at Lonclon Land Policy Institute, बोस्टन USA
- डॉ. एस. डी. महाजन – जीवशास्त्रतज्ज्ञ
- डॉ. राजेन्द्र शेंड्ये – Former Director UNEP २००७ मध्ये IPCC नावाच्या पॅनलला जो अल गोर यांच्या अध्यक्षतेखाली हवामान बदलावर काम करित आहेत त्यांना शांततेचे नोबेल पारितोषिक देण्यात आले. त्या पॅनेलमध्ये राजेंद्र शेंड्ये होते.

**राष्ट्रीय सेवा योजनेचे निवासी शिबीर**

२५ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत हिंदू सेवा संघ मामणोली या ठिकाणी घेण्यात आले. शिबीरा दरम्यान श्रमदान, दुपारच्या सत्रात वक्त्यांचे वेगवेगळ्या विषयावरील प्रबोधन व सायंकाळी मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने खेळ व उपक्रम अशा प्रकारचे दैनंदिन कार्यक्रम घेण्यात आले. या शिबीरात ७० स्वयंसेवक सहभागी झाले होते.

राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी डिसेंबर महिन्यातील नवरंग महोत्सव व जानेवारी महिन्यातील गंधर्व महोत्सवात स्वयंसेवक म्हणून सहभागी झाले.

महिलांवरील वाढते अत्याचार व असुरक्षितता या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय सेवा योजना व महिला विकास कक्ष तसेच, रोटरी क्लब लेक सिटी यांचया संयुक्त विद्यमाने 'सुसंवाद' या कार्यक्रमाचे आयोजन १० जानेवारी २०१३ रोजी करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह, ॲडव्होकेट माधवी नाईक, पत्रकार

शशिकांत कोठेकर, अभिनेत्री संपदा जोगळेकर, पोलीस उप-निरीक्षक सुषमा पाटील व समुपदेशक श्रीमती सई लेले या सहभागी झाल्या होत्या. वाढत्या असुरक्षिततेवर कोणते उपाय योजता येतील यावर त्यांना विद्यार्थ्यांशी संवाद साधला व नंतर प्रश्नोत्तराचा कार्यक्रम रंगला.

याच संदर्भात विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना व महिला विकास कक्ष यांनी २३ जानेवारी हा दिवस 'जागरुकता व कर्ता दिन' म्हणून साजरा करण्याचे ठरवले. या दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंग व कार्यक्रम अधिकारी व महिला विकास कक्षप्रमुख प्रियंवदा ऐकेकर यांनी प्रत्येक वर्गात जाऊन मुलांशी संवाद साधला व आपल्या महाविद्यालयात लिंगभावाचा आदर करून सुरक्षित वातावरण ठेवण्याची शपथ दिली.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय ठाणे

१) २ जानेवारी ते ५ जानेवारी दरम्यान तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यासाठी ड्राफ्टिंग या विषयावरील विशेष व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. ७ जानेवारी रोजी पहिली अभिरुप न्यायालय परीक्षा घेण्यात आली.

२) मुंबई विद्यापीठाच्या विधी परीक्षा नोव्हेंबर २०१२ च्या परीक्षेचे पेपर तपासणी केंद्राचे काम विधी महाविद्यालयात दिनांक ३.१२.२०१२ ते १९.१.२०१३ दरम्यान संपन्न झाले. सुमारे ४११० उत्तर पत्रिकांची तपासणी या कालावधीत करण्यात आली.

३) ११ जानेवारी २०१३ रोजी स्पीक. अप. लैंगिक अत्याचाराविरुद्ध वक्तृत्व स्पर्धा व पोस्टर मेकिंग स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. पोस्टर मेकिंग स्पर्धेला प्रतिसाद मिळाला नाही तर वक्तृत्व स्पर्धेत ११ विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

स्पर्धेचा निकाल - १) रंजनी कृष्णन् (प्रथम क्रमांक)
२) कृष्णा कामत (द्वितीय क्रमांक)
३) प्रिती महाजन (तृतीय क्रमांक)

वक्तृत्व स्पर्धा मराठी आणि इंग्रजी भाषेमधून घेण्यात आली.

४) बॉम्बे काउन्सिल ऑफ अॅकेडेमिशियन अॅन्ड प्रोफेशनल्स यांनी या विषयावरती विद्यापीठाच्या कॉन्हवेकेशन हॉलमध्ये परिसंवादाचे आयोजन केले होते.

५) २६ जानेवारी २०१३ रोजी राज्यस्तरीय नानी पालखीवाला वक्तृत्व स्पर्धेत विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी श्री. जयेश गोखले-तृतीय वर्ष विधी यांनी द्वितीय पारितोषिक मिळविले.

या विषयावर भाषण केले. रोख रक्कम, प्रशस्तिपत्रक आणि पुस्तके त्यांना बक्षिस म्हणून मिळाले.

६) ससेक्स विद्यापीठामध्ये एल. एल. एम्. अभ्यासक्रम- ३० जानेवारी २०१३ रोजी रोशनी शहा यांनी ससेक्स विद्यापीठामध्ये एल.एल.एम्. अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेण्यासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

●●●

दि
शा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

मन भीती वाढवतं.

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयीः**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे**. त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


●●●

(पृष्ठ क्र. .....२ वरून)

हव्यात. सर्व शिक्षा अभियान, एक किलोमीटर परिसरात एक शाळा इ. विचार ऐकायला बरे वाटणारे विषय समित्यांच्या अहवालात आहेतच, पण त्यांची 'वने' नष्ट होणार नाहीत, त्यांच्या नद्यांची गटारे होणार नाहीत, इतपत जरी जाण राजकीय रस असणाऱ्यांना आली तर तो सुदिन!

३६५ दिवसांतील प्रत्येकच दिवस जागतिक राज्य स्तरावर, राष्ट्र स्तरावर आम्ही विशिष्ट कारणाशी निबद्ध केला आहे. परंतु या दिनविशेषांच्या यादीत थांबून विचार करावा असा 'जल', 'वन' व 'हवामान' दिन आहे. संशोधक अतिशय मोलाचे संशोधन करतात. त्यांनी ते समाजभिमुख करावे, माध्यमांनी या विषयांबाबत आपली जबाबदारी ओळखावी व हे विषय पुस्तकी न ठेवता दैनंदिन जीवनाशी जोडावेत. स्वयंसेवी संस्थांमध्ये (अपवाद् वगळता) राजकारणाची कीड शिरू पाहत आहे. त्यांनीही या संदर्भात असे विषय सर्वसामान्यांपर्यंत न्यावेत, त्यांच्यातून अपप्रवृत्तींबरोबर लढणारे दबावगट निर्माण करावेत; असे झाले तर तो सुदिन ठरेल.

**– मोहन पाठक, ठाणे**



## विद्या प्रसारक मंडळाचे स्वप्न

*वेळणेश्वर पाहिलं,*
*ऐकली गाज समुद्राची.*
*परशुरामाने कोकण निर्माण केलं ...*
*त्याचाच आवाज तो*
*या सर्वांशी नातं जोडलं*
*आमच्या विद्या प्रसारक मंडळाने*
*टाकत दोन पावले पुढे*
*ओळखून गरज काळाची*
*परशुरामाच्या हातातील परशु घेत*
*घातला घाव कोकणच्या कातळावर*
*आणि सुरू झाली कहाणी*
*विराट स्वप्न प्रत्यक्षात येण्याची ...*
*अभियांत्रिकी गुरुकुलाची ओळखत गरज*
*वर्तमानाचे आरोग्य जपणाऱ्या*
*आमच्या डॉक्टरांनी*
*स्टेथस्कोप लावला कोकणच्या मातीला*
*तिची नाडी ओळखत*
*केली धडपड सुरू*
*डॉक्टरांची विजय मिळवणारी स्पंदने ऐकत*
*समुद्रही घाबरला.*
*आता आपला प्रतिस्पर्धी समोर आहे*
*असा विचार करत, क्षणभर थरारला ...*

**– मोहन पाठक**

●●●

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❈ संपर्क ❈

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.